



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६४ वे * अंक ३३८ * नांदेड * गुरूवार, दि. १८ डिसेंबर २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी



- वॉरंट जाहीर होताच कोकाटे रूग्णालयात दाखल
- मंत्रीपदासह आमदारकीही जाण्याची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात नाशिक जिल्हा न्यायालयाने अटक वॉरंट जारी केले आहे. त्यामुळे मंत्री माणिकराव कोकाटे यांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता आहे. वॉरंट जाहीर होताच माणिकराव कोकाटे हे मुंबईतील लिलावती रूग्णालयात दाखल झाले आहेत. या कारवाईमुळे त्यांचे मंत्रीपद व आमदारकीही जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने मंगळवारी सदनिका घोटाळाप्रकरणात माणिकराव कोकाटे यांना कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली होती. यानंतर सदनिका घोटाळाप्रकरणातील याचिकाकर्त्या अंजली दिघोळ राठोड यांनी माणिकराव कोकाटे यांनी माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी करण्यासाठी नाशिक जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या अर्जावर युक्तिवाद होऊन न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी केले. हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी मोठा धक्का मानला जात आहे. त्यामुळे आता अजित पवार माणिकराव कोकाटे यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यायला सांगणार का, याकडे सगळ्यांच्या नजरा लागल्या आहेत.

माणिकराव कोकाटे यांनी त्वरीत पोलिसांसमोर हजर व्हावे किंवा पोलिसांनी त्यांना अटक करावी, असा आदेश कोर्टाने दिला आहे. कायद्यापुढे सर्व लोक समान आहेत, मग तो कोणी मंत्री असो किंवा अन्य कोणीही असो, असे न्यायालयाने निकाल देताना सांगितले. यावेळी माणिकराव कोकाटे यांच्या वकिलांनी अटक वॉरंट टाळण्यासाठी जोरदार युक्तिवाद केला. कोकाटे यांच्याबाबत सहानुभूतीने विचार करावा, असे ॲडव्होकेट मनोज पिंगळे यांनी म्हटले.

# किड्स किंग्डम स्कूलला शिक्षण विभागाने बजावली नोटीस

- बोगस स्कूलप्रकरणी तात्काळ खुलासा करण्याचे दिले आदेश
- पालकांमध्ये अस्वस्थता, अनेक पालकांनी शाळेत जाऊन विचारला जाब







**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील अत्यंत प्रतिष्ठित शाळा मानल्या जाणाऱ्या किड्स किंग्डम स्कूलला बोगस शाळा प्रकरणी शिक्षण विभागाने नोटीस बजावली आहे. बोगस शाळा चालविल्याप्रकरणी तात्काळ खुलासा करण्याचे आदेश शिक्षण विभागाने किड्स किंगडम स्कूलला दिले आहेत.

किड्स किंग्डम या शाळेऐवजी त्या जागी श्री चैतन्य टेक्नो स्कूल या नावाने गेल्या काही वर्षांपासून शाळा सुरू करण्यात आली होती. किड्स किंग्डम शाळेच्या भव्य इमारतीतच भला मोठा बोर्ड लावून ही शाळा चालविण्यात येत होती. मात्र या शाळेला महाराष्ट्र शासनाच्या शालेय विभागाकडून किंवा त्याचबरोबर सीबीएससी किंवा इतर तत्सम कोणत्याही बोर्डाकडून कसलीही परवानगी देण्यात आली नसल्याची बाब उघडकीस आली. याबाबतचे वृत्त प्रकाशित झाल्यानंतर पालकांसह सारेच अवाक झाले.

बोगस शाळेचा हा प्रकार उघडकीस येताच, या भव्य इमारतीवरील श्री चैतन्य टेक्नो स्कूलचे बोर्ड तात्काळ हटविण्यात येऊन त्या जागी पुन्हा पूर्वीच्याच किड्स किंग्डम स्कूलचे बोर्ड लावण्यात आले आहेत. या प्रकाराने पालक, विद्यार्थ्यांसह सर्वजण चकित झाले. याबाबत आता शिक्षण विभागाने किड्स किंग्डम स्कूलला नोटीस बजावली आहे. या बोगस शाळा प्रकरणी तात्काळ खुलासा करीत उत्तर देण्याचे आदेश शिक्षण विभागाने काढले आहेत. शाळा प्रशासनाकडून याबाबत काय उत्तर दिले जाणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. याबाबत दोषींवर कडक कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने दिला आहे.

### पालकांनी शाळेत जाऊन विचारला जाब

दरम्यान, या बोगस शाळा प्रकरणावरून पालकांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. अनेक पालकांनी किड्स किंग्डम शाळेत जाऊन शाळा प्रशासनाला या प्रकरणावरून जाब विचारला. त्यावेळी शाळा प्रशासनाने दोन महिन्यांत आम्ही सर्व गोष्टी सुरळीत करू असे लेखी आश्वासन पालकांना दिल्याचे सांगण्यात आले.

## भारत-द. आफ्रिका चौथा टी-२० सामना रद्द

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील चौथा टी-२० सामना लखनौमध्ये खेळवला जाणार होता, पण हा सामना आता रद्द करण्यात आला आहे.

नाणेफेक न होताच खूप धुकं असल्याने दृश्यमानता सामन्यासाठी चांगली नसल्याने हा सामना रद्द केला गेला आहे. पंचांनी ९.२५ पर्यंत नाणेफेक होईल आणि सामना सुरू होईल यासाठी वाट पाहिली. पण हवामान पाहता सामना खेळवला जाणार नसल्याची माहिती दोन्ही संघांना देण्यात आली आहे.

## आमदार धनंजय मुंडे थेट दिल्लीत, अमित शाह यांची भेट घेतल्याची राजकीय वर्तुळात चर्चा

### कोकाटेंच्या जागी संधी मिळविण्याचा प्रयत्न

**मुंबई (प्रतिनिधी)–** सदनिका घोटाळाप्रकरणी राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात नाशिक जिल्हा न्यायालयाने अटक वॉरंट जारी केले आहे. तसेच माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी देखील विरोधकांकडून केली जात आहे. अशातच माजी मंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांनी आज दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याची चर्चा आहे.

त्यामुळे मंत्री माणिकराव कोकाटे यांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता आहे. नाशिक उच्च न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांना कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली होती. दरम्यान, आमदार धनंजय मुंडे यांनी अमित शाह यांची भेट घेतल्यानंतर राजकीय वर्तुळात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. माणिकराव कोकाटे यांच्या जागी धनंजय मुंडे हे मंत्रीमंडळात आपली वर्णी लागावी यासाठी प्रयत्न करीत असल्याचे बोलले जात आहे.

## नांदेडमध्ये युतीसाठी भाजप-शिवसेनेत चर्चेला सुरूवात

### खरोखरच युती की, केवळ चर्चा!

**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिकेत भारतीय जनता पक्ष व शिवसेना या महायुतीमधील दोन घटक पक्षांमध्ये युती करण्याबाबत चर्चा करण्यात येत आहे. यासंदर्भात दोन्ही पक्षांकडून नेमण्यात आलेल्या समन्वय समितीची पहिली बैठक बुधवारी हॉटेल विसावा येथे पार पडली. या बैठकीमध्ये युतीसंदर्भात सकारात्मक चर्चा झाली असल्याचे भाजपच्यावतीने सांगण्यात आले. युतीसाठी चर्चा सुरू झाली असली तरी खरोखरच युती होईल की, केवळ चर्चाच होत आहे, याबाबत चर्चांना उधाण आले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या नेत्यांनी राज्यामध्ये महायुतीच्या माध्यमातून मनपा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार नांदेड मनपासाठी दोन्ही पक्षांची समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये भाजपकडून महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, खा. अजित गोपछडे, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, माजी महानगराध्यक्ष दिलीप कंदकुर्ते व प्रदेश कार्यकारिणी सदस्य चैतन्यबापू देशमुख यांचा समावेश आहे. तर शिवसेनेकडून आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंद बोंढारकर, विनय गिरडे पाटील, उमेश मुंडे, गंगाधर बडुरे हे तीन जिल्हाप्रमुख हे समन्वय समितीचे सदस्य असणार आहेत.

या संदर्भातील पहिली बैठक बुधवारी घेण्यात आली. या बैठकीमध्ये महायुतीतील जागा वाटपासंदर्भात प्राथमिक चर्चा झाली. जागा वाटपासंदर्भात चर्चेच्या आणखी काही फेऱ्या झाल्यानंतर अंतिम निर्णय दोन्ही पक्षांच्या श्रेष्ठींमार्फत होणार असल्याचे सांगण्यात आले.

बुधवारच्या बैठकीमध्ये भाजपकडून माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, दिलीप कंदकुर्ते, चैतन्यबापू देशमुख, तर शिवसेनेकडून विनय गिरडे, उमेश मुंडे व गंगाधर बडुरे यांनी सहभाग घेतला. बैठकीचा अधिकृत वृत्तांत जरी बाहेर आला नसला तरी खरोखरच युती होईल का याबाबत साशंकता व्यक्त करण्यात येत आहे.

## दोन सख्ख्या भावांचे एकाच रात्री निधन

### दोन भावाची एकाच वेळेस निघाली अंत्ययात्रा



**नांदेड (प्रतिनिधी)–** हदगाव येथील शिवसेनेचे माजी नगरसेवक विश्वंभर महाराज गोदजे यांचे ७२ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन मंगळवारी रात्री झाले. तर त्यांचे छोटे भाऊ ओम महाराज गोदजे (७०) यांचे याच रात्री पहाटे चार वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.

येथील जुन्या गावातील माजी नगरसेवक विश्वंभर महाराज हे पंधरा दिवसांपूर्वी अचानक पडल्यामुळे त्यांचे ऑपरेशन झाले होते. त्यात मंगळवारी रात्री नऊ वाजता त्यांचे निधन झाले. तर त्यांचे सख्खे लहान भाऊ ओम महाराज यांना काही दिवसांपूर्वी अर्धांगवायुचा झटका आल्यामुळे ते आजारी होते. पहाटे चार वाजता त्यांचे निधन झाले.

बुधवारी दुपारी दोन्ही भावांची एकाचवेळी अंत्ययात्रा काढण्यात आली. त्यांच्या अंत्यविधीस माजी खासदार सुभाषराव वानखेडे, आमदार बाबुराव कदम कोहळीकर, माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्यासह अनेकजण उपस्थित होते. विश्वंभर महाराज यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी तर ओम महाराज यांच्या पश्चात चार मुली, दोन मुले असा परिवार आहे.

## राहुल गांधींचे कट्टर सोबती राजीव सातव यांच्या पत्नी आमदार प्रज्ञा भाजपमध्ये?

**मुंबई (प्रतिनिधी)–** काँग्रेसचे दिवंगत नेते राजीव सातव यांच्या पत्नी आमदार प्रज्ञा सातव यांचा भाजप प्रवेश ठरल्याची माहिती आहे. प्रज्ञा सातव यांचा भाजप प्रवेश ठरल्याची होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून होत असलेल्या गटबाजीला कंटाळून त्यांनी हा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. दरम्यान, काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी या पक्षप्रवेशात तथ्य नसल्याचे म्हटलं आहे. स्वर्गीय राजीव सातव यांच्या निधनानंतर काँग्रेसकडून त्यांची विधानपरिषदेवर वर्णी लावण्यात आली होती.

डॉ. प्रज्ञा सातव या दिवगंत काँग्रेस नेते राजीव सातव यांच्या पत्नी आहेत. राजीव सातव हे २०१४ ते २०१९ दरम्यान हिंगोलीचे खासदार होते. गांधी घराण्याच्या अत्यंत जवळचे असलेल्या राजीव सातव यांचं २०२१ मध्ये आजारपणामुळे निधन झालं. प्रज्ञा सातव या महाराष्ट्र राज्य काँग्रेस समितीच्या उपाध्यक्ष असून सध्या विधान परिषदेच्या आमदार आहेत.

## अजित पवारांचा आणखी एक आमदार अडचणीत

**अकोला (प्रतिनिधी)–** अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे भंडाऱ्याचे आमदार पोलिसांना शिवीगाळ प्रकरणात दोषी ठरल्याने अडचणीत आले आहेत.

भंडाऱ्यात राष्ट्रवादीचे आमदार राजू कारेमोरे यांना, दोन वर्षात शिस्तीत राहण्याची तंबी देत एका प्रकरणात मुक्तता केली. भंडाऱ्याच्या तुमसर-मोहाडी विधानसभेचे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार राजू कारेमोरे हे एका प्रकरणात आज दोषी असल्याचा निर्णय भंडारा जिल्हा सत्र न्यायालय द्वितीय श्रेणीच्या न्यायाधीश भारती काळे यांनी दिला.

## राज-उद्धव ठाकरे पुन्हा ग्रँड शो करणार, ठाकरे गट-मनसे युतीची होणार घोषणा

**मुंबई (प्रतिनिधी)–** आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्याकडून येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये मनसे-ठाकरे गटाच्या युतीची घोषणा होणार असल्याची माहिती समोर आली आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे भव्य मेळावा घेऊन एकाच व्यासपीठावरुन ही घोषणा करतील. यावेळी मनसे आणि ठाकरे गटाकडून मोठ्या शक्तीप्रदर्शनाची तयारी केली जात आहे.

२३ डिसेंबरपासून महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात होईल. त्यापूर्वी म्हणजे येत्या सोमवारपर्यंत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्याकडून संयुक्त मेळावा घेऊन युतीची अधिकृत घोषणा केली जाईल, असे सांगितले जात आहे. राज आणि उद्धव ठाकरे यांचे मनोमीलन झाले असले तरी त्यांच्या दोन्ही पक्षांची युती कधी होणार, याकडे शिवसैनिक आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्यकर्ते डोळे लावून बसले आहेत.




# नशेच्या औषध विक्रीविरोधात एफडीएची कारवाई, जिल्ह्यातील ३२ दुकानांचे परवाने निलंबित

### ४८ औषधी दुकानांना कारणे दाखवा नोटीस

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील अन्न व औषध प्रशासन विभागाच्यावतीने नशेच्या औषधांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या मेडिकल स्टोअर्सविरोधात कठोर कारवाई करण्यात आली आहे. जिल्ह्यातील ४८ औषधी दुकानांना कारणे दाखवा नोटीस देऊन ३२ दुकानांचे परवाने निलंबित केले आहे तर १३ दुकानांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आल्याचे सहायक आयुक्त (औषध) अ. तु. राठोड यांनी कळविले आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिकांना नशेच्या गोळ्यांची बेकायदेशीर विक्री करणारी किंवा नियमबाह्य औषध विक्री करणारी कोणतीही औषधी पेढी आढळून आल्यास त्यांनी सहायक आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, नांदेड यांच्याशी संपर्क साधून कार्यालयाकडे लेखी तक्रार सादर करावी. यामुळे कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या औषधी दुकानांविरोधात प्रभावी कारवाई करणे प्रशासनास शक्य होईल.

कोटा (राजस्थान)च्या धर्तीवर नांदेड शहर हे शैक्षणिक हब म्हणून विकसित होत आहे. राज्यासह परराज्यातून मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षणासाठी नांदेड येथे वास्तव्यास आहेत. काही मेडिकल स्टोअर्समार्फत नशेच्या औषधांची व गोळ्यांची सहज उपलब्धता होत असल्याबाबत निदर्शनास आले होते. त्या अनुषंगाने नांदेड शहरासह जिल्ह्यातील विविध भागांतील औषधी दुकानांची विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. विभागातील औषध निरीक्षकांच्या सहकार्याने विशेष तपासणी मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली आहे.

या मोहिमेत नोव्हेंबर २०२५ अखेर डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय नशेच्या गोळ्यांची विक्री तसेच औषध कायद्याच्या इतर तरतुदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी एकूण ४८ औषधी पेढ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावून लेखी स्पष्टीकरण मागविण्यात आले होते. प्राप्त स्पष्टीकरण समाधानकारक न आढळल्याने ३२ औषधी पेढ्यांचे परवाने निलंबित करण्यात आले असून १३ औषधी पेढ्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. उर्वरित ३ औषधी पेढ्यांविरोधात कारवाई प्रस्तावित आहे. कारवाई करण्यात आलेल्या काही औषधी पेढ्यांनी शासनस्तरावरून स्थगिती आदेश प्राप्त केल्यामुळे त्यांच्याविरोधातील प्रकरणे शासनस्तरावर प्रलंबित आहेत, अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त औषधे अ.तु.राठोड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

## आयपीएल २०२६ चे वेळापत्रक जाहीर; २६ मार्चला पहिला सामना



**मुंबई (प्रतिनिधी)–** आयपीएल २०२६ तब्बल ६७ दिवस चालणार आहे. बीसीसीआयने जाहीर केलेल्या तारखांनुसार आयपीएल २०२६ ची सुरुवात २६ मार्च २०२६ रोजी होईल आणि समारोप ३१ मे २०२६ रोजी होणार आहे.

अबुधाबी येथे आयपीएल २०२६ साठी मंगळवारी मिनी ऑक्शन अर्थात छोटा लिलाव झाला. यावेळी सर्व फ्रँचायझींना अर्थात संघ व्यवस्थापनांना आयपीएल २०२६ च्या तारखांची औपचारिक माहिती देण्यात आली. बीसीसीआयने अद्याप आयपीएल २०२६ चा सविस्तर कार्यक्रम जाहीर केलेला नाही पण स्पर्धा ६७ दिवस चालणार असल्याची कल्पना दिली आहे.

आयपीएलचा १९ वा हंगाम भारत आणि श्रीलंकेत ७ फेब्रुवारी ते ८ मार्च दरम्यान होणाऱ्या पुरुषांच्या टी-२० विश्वचषकाच्या समाप्तीनंतर सुमारे तीन आठवड्यांनी सुरू होईल आणि तो दोन महिन्यांहून अधिक काळ चालेल.

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
## सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची अधिसूचना

वाचा:-

१) मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी महानगरपालिका आयुक्तांना प्राधिकृत केल्याचा आदेश क्र.एसईसी/१०९४/१७५/१९९४ दि.०७ नोव्हेंबर १९९४
२) मा. राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.५/का-०५ दि. ०६.०८.२०२५
३) मा. राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.५/का-०५ दि. २८.०८.२०२५
४) मा. राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचे पत्र क्र रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.५/का.०५ दि. १०.१२.२०२५
५) मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र. २०२५/नपप्र/निवडणूक२०२५/कावि-६३० दि.१२.१२.२०२५ व
६) मा. राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का-०५ दि. १५.१२.२०२५
७) कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/निवड/४३२/२५ दिनांक १५.१२.२०२५
८) कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/निवड/४४१/२५ दिनांक १७.१२.२०२५
९) मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र. २०२५/नपप्र/निवडणूक-२०२५/कावि-६३३ दि.१७.१२.२०२५

क्रमांक जा.क्र.नांवाशमनपा/निवड/४४३/२५ दि.१८.१२.२०२५, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व सदर अधिनियमाच्या अनुसूची ड मधील निवडणूक नियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका (महानगरपालिकेच्या निवडणूका घेणे) (अनुसूची ड ची सुधारणा) नियम २००२ मधील तरतुदीनूसार मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी नांदेड वाघाळा शहर महानरगपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५ करिता खालील प्रमाणे निवडणूक कार्यक्रम निश्चित करून दिलेला असून, उपरोक्त आदेशातील तरतुदीनूसार मी, डॉ.महेशकुमार डोईफोडे, आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी खालील प्रमाणे निवडणूकीचा कार्यक्रम याद्वारे प्रसिध्द करीत आहे.

### कार्यक्रम

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु अथवा पुर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| | मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | दिनांक ०१ जुलै २०२५ (मंगळवार) |
| १. | नामनिर्देशन पत्र देण्यांचा कालावधी | दिनांक २३ डिसेंबर, २०२५ (मंगळवार) ते दिनांक २९ डिसेंबर, २०२५ (सोमवार)<br>(सकाळी ११ ते दुपारी ३)<br>दिनांक ३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार)<br>(सकाळी ११ ते दुपारी २)<br>(गुरुवार दिनांक २५ डिसेंबर, २०२५ व रविवार दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी नामनिर्देशन पत्रे देण्यांत येणार नाहीत) |
| २. | वरील नामनिर्देशन पत्रे स्विकारण्याचा कालावधी | दिनांक २३ डिसेंबर, २०२५ (मंगळवार) ते दिनांक ३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार)<br>(सकाळी ११ ते दुपारी ३)<br>(गुरुवार दिनांक २५ डिसेंबर, २०२५ व रविवार दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी नामनिर्देशन पत्रे स्विकारण्यांत येणार नाहीत) |
| ३. | नामनिर्देशन पत्राची छाननी | दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ (बुधवार) सकाळी ११ वाजल्या पासून |

पृष्ठ क्र.
२पृष्ठ क्र. १

### कार्यक्रम

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु अथवा पुर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| ४. | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | छानिनी पुर्ण झाल्यानंतर लगेच |
| ५. | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०२ जानेवारी, २०२६ (शुक्रवार) पर्यन्त (सकाळी ११ ते दुपारी ३) |
| ६. | निवडणूक चिन्ह नेमून देण्यांचा दिनांक | दिनांक ०३ जानेवारी, २०२६ (शनिवार) (सकाळी ११ वाजल्यापासून) |
| ७. | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराची यादी प्रसिध्द करणे | दिनांक ०३ जानेवारी, २०२६ (शनिवार) |
| ८. | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दिनांक १५ जानेवारी, २०२६ (गुरुवार) (सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत.) |
| ९. | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | दिनांक १६ जानेवारी, २०२६ (शुक्रवार)<br>सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| १०. | शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | दिनांक १९ जानेवारी, २०२६ (सोमवार) पर्यंत. |

मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी निवडणूकीचा कार्यक्रम पार पाडणेसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता निवडणूक निर्णय अधिकारी उपलब्ध करुन दिले होते. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी यांनी त्यांची नेमणूक केलेली असून, त्यांची नांवे खालील तक्त्यात स्तंभ क्र. ४ मधे दिलेली आहेत तसेच त्यांना नेमून दिलेले प्रभाग स्तंभ क्र. २ मध्ये दर्शविण्यांत आलेले आहेत. त्याशिवाय निवडणूक निर्णय अधिकारी यांचे मदतीसाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत आलेली असून त्यांची नांवे स्तंभ क्र. ५ दर्शविण्यांत आलेली आहेत.

| अ.क्र. | नेमुन देण्यांत आलेले प्रभाग क्र. व आरक्षणाचा तपशील | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे ठिकाण | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव व पदनाम | सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव व पदनाम | मतमोजणीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | **प्रभाग क्र. १ तरोडा (खु.)**<br>अ-अनु. जाती महिला<br>ब-नामाप्र<br>क-सर्वसाधारण महिला<br>ड-सर्वसाधारण<br>**प्रभाग क्र. २ तरोडा (बु.)**<br>अ-अनु. जाती महिला<br>ब-नामाप्र<br>क-सर्वसाधारण महिला<br>ड-सर्वसाधारण<br>**प्रभाग क्र. ३ सांगवी (बु.)**<br>अ-अनु. जाती महिला<br>ब-नामाप्र<br>क-सर्वसाधारण महिला<br>ड-सर्वसाधारण | प्रशिक्षण केंद्र हॉल, एस. टी. महामंडळ वर्कशॉप, नांदेड | १. श्री. संजीव मोरे, उपजिल्हाधिकारी, (पुनर्वसन) नांदेड | १. श्री. शंकर लाड, तहसिलदार, (सर्वसाधारण) जिल्हाधिकारी कार्या. नांदेड<br><br>२. श्रीमती निलावती डावरे, क्षेत्रिय अधिकारी क्र. १ म. न. पा. नांदेड<br><br>३. श्री खुशाल कदम उपअभियंता, म.न.पा. नांदेड | माहिती व तंत्रज्ञान इमारत शासकिय तंत्रनिकेतन नांदेड. |

पृष्ठ क्र. ३

| अ.क्र. | नेमुन देण्यांत आलेले प्रभाग क्र. व आरक्षणाचा तपशील | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे ठिकाण | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव व पदनाम | सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव व पदनाम | मतमोजणीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २. | **प्रभाग क्र. ४ हनुमानगढ**<br>अ-अनु. जाती<br>ब-अनु. जमाती महिला<br>क-नामाप्र महिला<br>ड-सर्वसाधारण<br>**प्रभाग क्र. ५ भाग्यनगर**<br>अ-अनु. जाती<br>ब-नामाप्र महिला<br>क-सर्वसाधारण महिला<br>ड-सर्वसाधारण<br>**प्रभाग क्र. ९ नवामोंढा**<br>अ-अनु. जाती महिला<br>ब-नामाप्र<br>क-सर्वसाधारण महिला<br>ड-सर्वसाधारण | तळमजला, श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम, नांदेड | २. श्रीमती क्रांती डोंबे, उपविभागीय अधिकारी, बिलोली | १. श्री विकास बिरादार, तहसिलदार (सामान्य), जिल्हाधिकारी कार्या. नांदेड<br><br>२. श्री राजेश जाधव क्षेत्रिय अधिकारी क्र. २ म. न. पा. नांदेड<br><br>३. श्री प्रकाश कांबळे उपअभियंता, मनपा, नांदेड | माहिती व तंत्रज्ञान इमारत शासकिय तंत्रनिकेतन नांदेड. |
| ३. | **प्रभाग क्र. ६ गणेश नगर**<br>अ-अनु. जाती महिला<br>ब-नामाप्र<br>क-सर्वसाधारण महिला<br>ड-सर्वसाधारण<br>**प्रभाग क्र. ७ जयभीमनगर / मगदुमनगर**<br>अ-अनु. जाती<br>ब-नामाप्र महिला<br>क-सर्वसाधारण महिला<br>ड-सर्वसाधारण<br>**प्रभाग क्र. ८ शिवाजीनगर**<br>अ-अनु. जाती<br>ब-नामाप्र महिला<br>क-सर्वसाधारण महिला<br>ड-सर्वसाधारण | तळमजला, कामगार कल्याण भवन, नांदेड | ३. श्री. सचिन खल्लाळ, उपविभागीय अधिकारी, नांदेड | १. श्री. रेणुकादास देवणीकर, तहसिलदार, अर्धापुर<br><br>२. श्री रमेश चवरे, क्षेत्रिय अधिकारी क्र. ३ म. न. पा. नांदेड<br><br>३. श्री अरुण शिंदे उपअभियंता, मनपा, नांदेड | माहिती व तंत्रज्ञान इमारत शासकिय तंत्रनिकेतन नांदेड. |
| ४. | **प्रभाग क्र. १० दत्त नगर**<br>अ-अनु. जाती<br>ब-नामाप्र महिला<br>क-सर्वसाधारण महिला<br>ड-सर्वसाधारण<br>**प्रभाग क्र. ११ हैदरबाग**<br>अ-नामाप्र महिला<br>ब-सर्वसाधारण महिला<br>क-सर्वसाधारण<br>ड-सर्वसाधारण | कापुस संशोधन केंद्र देगलुर नाका नांदेड | ४. श्री. अविनाश कांबळे, उपविभागीय अधिकारी, हदगाव, | १. श्री. हरीशचंद्र गाढे तहसिलदार, औंढा नागनाथ, जि. हिंगोली.<br><br>२. श्री रावण सोनसळे, क्षेत्रिय अधिकारी क्र. ५ मनपा, नांदेड<br><br>३. श्री हफीजउल्ला खान उपअभियंता, मनपा नांदेड | माहिती व तंत्रज्ञान इमारत शासकिय तंत्रनिकेतन नांदेड. |

पृष्ठ क्र. ४

| अ.क्र. | नेमुन देण्यांत आलेले प्रभाग क्र. व आरक्षणाचा तपशील | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे ठिकाण | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव व पदनाम | सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव व पदनाम | मतमोजणीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | **प्रभाग क्र. १२ उमर कॉलनी**<br>अ-नामाप्र<br>ब-सर्वसाधारण महिला<br>क-सर्वसाधारण महिला<br>ड-सर्वसाधारण | | | | |
| ५. | **प्रभाग क्र. १३ चौफाळा / करबला**<br>अ-अनु. जाती महिला<br>ब-नामाप्र महिला<br>क-सर्वसाधारण<br>ड-सर्वसाधारण<br>**प्रभाग क्र. १४ इतवारा / मदिनानगर**<br>अ-अनु. जाती<br>ब-नामाप्र महिला<br>क-सर्वसाधारण महिला<br>ड-सर्वसाधारण<br>**प्रभाग क्र. १५ होळी / मन्यार गल्ली**<br>अ-नामाप्र<br>ब-सर्वसाधारण महिला<br>क-सर्वसाधारण महिला<br>ड-सर्वसाधारण | उर्दू घर, मदिनानगर, नांदेड | श्री विलास नरवटे, उपविभागीय अधिकारी, कंधार | १. धम्मप्रिया गायकवाड, तहसिलदार, नायगांव खै.<br><br>२.डॉ. श्री म. रईसोद्दिन, पशुशल्य चिकित्सक म. न. पा नांदेड<br><br>३. श्री नरेंद्र सुजलेगांवकर, उपअभियंता, मनपा नांदेड | माहिती व तंत्रज्ञान इमारत शासकिय तंत्रनिकेतन नांदेड. |
| ६. | **प्रभाग क्र. १६ वजिराबाद / गाडीपुरा**<br>अ-नामाप्र<br>ब-सर्वसाधारण महिला<br>क-सर्वसाधारण महिला<br>ड-सर्वसाधारण<br>**प्रभाग क्र. १७ गुरुद्वारा**<br>अ-नामाप्र महिला<br>ब-सर्वसाधारण महिला<br>क-सर्वसाधारण<br>ड-सर्वसाधारण<br>**प्रभाग क्र. १८ खडकपुरा / देगांवचाळ**<br>अ-अनु. जाती महिला<br>ब-नामाप्र<br>क-सर्वसाधारण महिला<br>ड-सर्वसाधारण | महाराजा रणजितसिंघजी मार्केट, क्षेत्रिय कार्यालय क्र. ४ जुना मोंढा, नांदेड | श्री प्रविण मेंगशेट्टी उपविभागीय अधिकारी भोकर | १. श्रीमती उषा इज्जपवार, तहसिलदार (संगायो), जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड<br><br>२. श्री गौतम कवडे,क्षेत्रिय अधि. क्र. ४ मनपा नांदेड<br><br>३. श्रीमती सुजाता कानिंदे, उपअभियंता, मनपा नांदेड | माहिती व तंत्रज्ञान इमारत शासकिय तंत्रनिकेतन नांदेड. |

(उर्वरित पान ५ वर...)

CMYK

# सार्वत्रिक निवडणुकीसाठी महापालिका प्रशासन सज्ज

## मतदारांनी निर्भयपणे व कुठल्याही आमिषाला बळी न पडता मतदान करावे -आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्य निवडणूक आयोगाने निर्देशीत केल्यानुसार दि.१५ डिसेंबरपासून पालिका हद्दीत आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. त्यामुळे सर्व विभाग प्रमुखांची तातडीची बैठक घेऊन प्रत्यक्ष आचारसंहिता अंमबजावणीसाठी सुचना दिलेल्या आहेत. निवडणुकीसाठी महापालिका प्रशासन सज्ज आहे. तसेच नांदेडच्या मतदारांनी निर्भयपणे व कुठल्याही आमिषाला बळी न पडता आपल्या मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी बुधवार, दि. १७ डिसेंबर रोजी पत्रकार परिषदेत केले.

या निवडणुकीत बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या एकूण २० प्रभागातून ८१ सदस्य निवडून द्यायचे असून, त्यातील ४१ महिला आहेत. प्रभाग क्र. २० मधून ५ सदस्य तर उर्वरित १९ प्रभागांतून प्रत्येकी ४ सदस्य निवडून द्यायचे आहेत. या निवडणूक प्रक्रियेत एकूण ५ लाख १ हजार ४९९ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार असून, त्यात २ लाख ५४ हजार ९९९ पुरुष मतदार तर २ लाख ४६ हजार ६९६ स्त्री व इतर १०४ मतदारांचा समावेश आहे.



राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार दि. २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात येणार असून, दि. ३१ डिसेंबर रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी होणार आहे. तद्नंतर वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येईल, उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दि. २ जानेवारी २०२६ असा असणार असून, दि. ३ जानेवारी २०२६ रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप होणार आहे. त्याचप्रमाणे दि. १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून, दि. १६ जानेवारी रोजी मतमोजणी पूर्ण करून निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन सज्ज असल्याचे आयुक्त डॉ. डोईफोडे यांनी सांगितले. निवडणूक विषयक कामकाज सुलभतेने व विकेंद्रित पद्धतीने पार पाडण्यासाठी विविध निवडणूक व्यवस्थापक कक्षांची स्थापन केली आहे. त्याचप्रमाणे उपजिल्हाधिकारी संवर्गातील ७ निवडणूक निर्णय अधिकारी तर तहसीलदार संवर्गातील ७ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना सहाय्यक म्हणून महापालिकेतील प्रत्येकी १ क्षेत्रिय अधिकारी व १ उपअभियंता संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शहराच्या भौगोलिक परिस्थितीनुसार त्या-त्या प्रभागातील नागरिकांच्या सुविधेसाठी एकूण ७ ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय स्थापित करण्यात आले. त्याचप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयनिहाय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, प्रत्येक कार्यालयास प्राथमिक स्वरुपात १० कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. पालिका निवडणुकीसाठी शहरात एकूण ६०० मतदान केंद्र स्थापित करण्यात आले. मतदान केंद्रावर आवश्यक असणारे मतदान यंत्रे त्यापैकी ६६० कंट्रोल युनिट व १३२० बॅलेट युनिटची मागणी निवडणूक आयोगाकडे करण्यात आल्याचे यावेळी आयुक्तांनी सांगितले.

मतदानाची प्रक्रिया पारदर्शकपणे व सुलभतेने पार पाडण्यासाठी मतदान केंद्रावर एकूण ३२०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतमोजणीसाठी ८० कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसह आदर्श आचारसंहिता अंमबजावणीसाठी SST व VST पथकांची नियुक्ती सुध्दा करण्यात येणार असून ही सर्व निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी जवळपास ४ हजार २२२ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याचे यावेळी आयुक्तांनी सांगितले. त्याचप्रमाणे SST व VST पथकांचे पर्यवेक्षण मुख्य आचारसंहिता कक्षातून होणार असल्याने निवडणूकीच्या अनुषंगाने प्रचार सभा, रॅली, इत्यादी कार्यक्रमांसाठी लागणाऱ्या परवानग्या व इतर बाबींसाठी एक खिडकी कक्ष स्थापन करण्यात येणार आहे.

# गोदावरी परिक्रमा यात्रेचे नरसीत जल्लोषात स्वागत



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** धर्म, भक्ती आणि अध्यात्माच्या जयघोषात गोदावरी परिक्रमा यात्रेचे नरसी नगरीत अभूतपूर्व स्वागत करण्यात आले. वृंदावन, अयोध्या, चित्रकूट, ओंकारेश्वर, उज्जैन, द्वारका, जगन्नाथपुरी या पवित्र तीर्थक्षेत्रांतून मार्गक्रमण करत आलेल्या गोदावरी परिक्रमा यात्रेचे मंगळवार, दि. १६ रोजी नरसी (ता. नायगाव) येथे ग्रामस्थांच्या वतीने पारंपरिक पद्धतीने, फुलांच्या वर्षावात आणि हरिनामाच्या गजरात स्वागत करण्यात आले.

अनंत विभूषित श्री अग्रपीठाधीश्वर एवं मलूक-पीठाधीश्वर परमपूज्य स्वामी राजेंद्रदास देवाचार्य महाराज यांच्या पावन सान्निध्यात तसेच सुमारे ५०० साधू-संत, महंत व अग्रपीठाधीश्वर यांच्या उपस्थितीत ही दिव्य परिक्रमा यात्रा मार्गस्थ आहे. यात्रेच्या आगमनाने संपूर्ण नरसी नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली होती.

गोदावरी परिक्रमेच्या निमित्ताने येथील बालाजी मंदिराच्या पद्मावती मंगल कार्यालयात आयोजित धार्मिक कार्यक्रमात स्वामी राजेंद्रदास देवाचार्य महाराज यांनी उपस्थित भक्तगणांना आशिर्वचन केले. त्यांच्या प्रवचनाने उपस्थित भाविक भारावून गेले.

या वेळी परमपूज्य रसीक संत किशोरदास महाराज (वृंदावन), संधर्म शिरोमणी गोवत्स बालयोगी व्यंकटस्वामी महाराज, महंत स्वामी शांतीब्रह्म यदुबन महाराज (कोलंबीकर) यांच्यासह अनेक संत-महंतांची उपस्थिती लाभली.

या भक्तिमय सोहळ्यास माजी मुख्यमंत्री व राज्यसभा खासदार खा. अशोकराव चव्हाण, माजी आमदार अमर राजूरकर, माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मण ठकरवाड, माणिकराव लोहगावे, संभाजी पाटील भिलवंडे, रविंद्र पाटील भिलवंडे, सरपंच गजानन पाटील भिलवंडे, नंदकिशोर नरसीकर, राजू गंदीगुडे, राजेश पाटील भिलवंडे, मोहन पाटील भिलवंडे, वसंतराव मेडेवार आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

हरिनामाचा गजर, भगव्या पताका, ढोल-ताशांचा निनाद आणि भक्तांच्या अपार श्रद्धेने नरसी नगरीत अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते. गोदावरी परिक्रमा यात्रेने गावकऱ्यांच्या मनात भक्तीचा दीप प्रज्वलित करत नरसीच्या धार्मिक परंपरेत एक अविस्मरणीय अध्याय जोडला.

# लोहा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा जलदूत बाबुराव केंद्रे यांची नासाच्या मुन मिशन बोर्डिंग पाससाठी निवड



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील नागदरवाडीचे भूमिपुत्र जलदूत बाबुराव केंद्रे यांची नासाच्या मून मिशन बोर्डिंग पाससाठी निवड झाली असल्याची माहिती नासाचे सदस्य तथा नोबेल पुरस्कार निवड समितीचे सदस्य डॉ. सुधीर तारे यांनी दिली. या निवडीमुळे लोहा तालुक्यातील शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

लोहा तालुक्यातील नागदरवाडीचे भूमिपुत्र जलदूत बाबुराव केंद्रे यांनी त्यांच्या अवर्षणग्रस्त नागदरवाडी गावामध्ये मोठी जलक्रांती करुन पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची भटकंती बंद करून पाणी फाऊंडेशनचे युद्ध पातळीवर कामे करून गाव पाणीदार केले. त्यानंतर त्यांनी लग्न केले. त्यांच्या कार्याची दखल मराठी चित्रपट सृष्टीने घेऊन त्यांच्या मराठी चित्रपट सृष्टीने जीवनावर आधारित सत्य कथेवर पाणी हा मराठी चित्रपट २०२३ मध्ये काढण्यात आला. २०२५ मध्ये जलदूत बाबुराव केंद्रे यांना भीमरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

तसेच आता २०२५ मध्ये जागतिक दर्जाची क्रमांक १ अमेरिकन अंतराळ संशोधन संस्था असल्याला नासा या संस्थेने मुन मिशन (चंद्र ग्रहावर) जलदूत बाबुराव केंद्रे यांच्या कार्याची माहिती जगातील सर्व देशाला मिळावी व त्यांची प्रेरणा घेऊन त्यांनी पाणीदार गावे करावे यासाठी जलदूत बाबुराव केंद्रे यांची अमेरिकेच्या नासा या अंतराळ संस्थेने मिशन मूनसाठी बोर्डिंग पास देऊन सन्मान केला आहे, अशी माहिती डॉ. सुधीर तारे यांनी दिली.

**लोह्यात बाबुराव केंद्रे यांचा सत्कार**

जलदूत बाबुराव केंद्रे यांची नासाच्या मून मिशन बोर्डिंग पाससाठी निवड झाल्याबद्दल त्यांचे लोह्यात मीडिया पोलीस सोशल क्लब पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष विलास सावळे, प्रेस संपादक सेवा संघाचे शिवराज पाटील पवार, प्रेस फोटोग्राफर विनोद महाबळे, माजी उपनगराध्यक्ष दता वाले, शिक्षक नेते हरीभाऊ चव्हाण, माजी नगरसेवक उत्तम महाबळे बिभीषण जाधव, नायक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य, रविभाऊ चव्हाण नायक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य आदी मित्रमंडळींनी शाल, पुष्पहार घालून सत्कार केला.

# नंदकिशोरनगर येथील ड्रेनेज लाईनच्या कामाचे भूमिपूजन



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या नंदकिशोरनगर भागात मागील काही वर्षांपासून ड्रेनेजविना नागरिकांची मोठी अडचण होत होती. या कामासाठी येथील शिवसेनेचे कार्यकर्ते मनोहर लोलगे यांनी पाठपुरावा करत अखेर ड्रेनेज लाईनच्या कामाची मंजुरी मिळविली. या कामाचे भूमिपूजन बुधवार, दि. १० डिसेंबर रोजी ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बबन बारसे यांच्या हस्ते करण्यात आले.

महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ अंतर्गत येणाऱ्या नंदकिशोर नगर येथील मनोहर लोलगे यांच्या प्रयत्नातून मंजूर झलेल्या ड्रेनेज लाईन कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हाप्रमुख बबन बारसे, मराठवाडा विभागीय सचिव महेश खेडकर, शहरप्रमुख रवी नागरगोजे, पिंटू सुनपे व मक्कू धानोरकर व नगरातील नागरिकांची उपस्थिती होती.

# डॉ. पूजा भालेराव महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित

**किनवट (प्रतिनिधी)–** किनवट तालुक्यातील मानसिक आरोग्य तज्ज्ञ डॉ. पूजा नंदा दत्तात्रय भालेराव यांना पुणे येथे महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र युनिव्हर्सल फाऊंडेशन यांच्यावतीने पुणे येथे सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांना त्यांच्या कामाचा गौरव करण्यासाठी दि. १० रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मानसिक आरोग्यावर मानसोपचार तज्ज्ञ म्हणून आदिवासी भागात काम करणाऱ्या डॉ. पूजा नंदा भालेराव यांना यंदाचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

वेळवेगळी गॅझेट, यांत्रिकीकरण आधुनिक जीवनशैली, नातेसंबंधांचा तणाव आणि कोविड यामुळे मानसिक रुग्णामध्ये प्रचंड वाढ झाली आहे. परंतु,



आजही ग्रामीण भागामध्ये मानसिक आरोग्यावर काम करण्यासाठी शासकीय आणि खासगी दोन्ही यंत्रणा दिसत नाही. त्यामुळे त्यांचे प्रश्न, उत्तर अधिकच गंभीर आहे. त्यांच्यावर मानसोपचार म्हणून केलेल्या कामाची दखल महाराष्ट्र युनिव्हर्सल फाऊंडेशनने घेतली, याचा आनंद तर आहेच परंतु पुरस्कार मिळाल्यामुळे काम करण्याची जबाबदारी देखील वाढली आहे, अशी प्रतिक्रिया डॉ. पूजा भालेराव यांनी व्यक्त केली.

# पीपल्स हायस्कूलचे बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षा २०२५ -२६ मध्ये इयत्ता सहावीचे एकूण ४ विद्यार्थी तर इयत्ता नववीचे एकूण १८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. स्पर्धा परीक्षेच्या दुसऱ्या फेरीकरिता इयत्ता सहावीचे २ विद्यार्थी तर इयत्ता नववीचे १२ विद्यार्थी पात्र झाले आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे, उपाध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील, सचिव प्रा. शामल पत्की, सहसचिव प्रफुल्लकुमार अग्रवाल, पीपल्स हायस्कूल शालेय समिती अध्यक्ष नौनिहालसिंघ जहागीरदार, शाळेचे मुख्याध्यापक नितीन सेलमोकर, पर्यवेक्षक प्रशांत चौधरी, दुपार शिफ्ट इन्चार्ज राजश्री भालेराव, राहुल गोरे, योजना बच्चेवार, उषा कंधारे, अरविंद काळे, प्रफुल्लता फुलारी, मनीषा वानेगावकर, व्ही. आर. चिलवरवार, मनोहर राठोड, विनोद टेकाळे, शिवराज कदम, पेदे, मंजुषा वानखेडे, श्रद्धा सावले, पुल्लावार, मनीषा पालेपवाड, अनिता गुंडेवार वैशाली ढवळे, जपलकर, अनिता सुरोशे, मंगेश चाभरेकर, प्रशांत मारलेवाड, पवन रत्नपारखी, दीपिका यादव, गाडेकर, विश्वास आंबेकर, पवार यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# काव्यरेखा कविता संग्रहाचे उत्साहात प्रकाशन



**नांदेड (प्रतिनिधी)–** आधुनिक वाल्मिकी गदीमा यांच्या स्मृतिदिन व नांदेड को. ऑप. बँकेचे माजी व्यवस्थापक राजन करकरे यांच्या ७१ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून सौ. आरती सुनिल मुळजे लिखित काव्यरेखा कविता संग्रहाचा प्रकाशन सोहळा विसावा हॉटेल, नांदेड येथे नुकताच पार पडला.

यावेळी काव्यरेखा कविता संग्रहाचा प्रकाशन सोहळा हा एक दुग्धशर्करा योगच म्हणावा लागेल. तसेच 'माणसे जोडण्याचा वारसा मला आई डॉ. यमुताई करकरे यांच्याकडून मिळाला, असे भावोद्गार राजन करकरे यांनी काढले.

या सोहळ्याच्या अध्यक्ष-स्थानी राजन करकरे हे होते तर काव्यरेखा कविता संग्रहाचे प्रकाशन सौ. अलका कुलकर्णी, माजी मुख्याध्यापिका, पीपल्स हायस्कूल नांदेड, सौ. मंगल शौनक जोशी माजी उपमुख्याध्यापिका, पीपल्स हायस्कूल नांदेड यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून प्रसिध्द साहित्यिक, समीक्षक व माजी उपप्राचार्य नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेडचे डॉ. दीपक कासराळीकर, प्रा. मदन मुळजे, माजी प्राध्यापक कुमारस्वामी महाविद्यालय, औसा हे होते.

पाहुण्यांचा परिचय समीर करकरे यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे नेटके निवेदन सौ. स्वाती कुलकर्णी यांनी केले तर सौ. राधिका करकरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# भाजयुमोचे शहर जिल्हा सरचिटणीस निखिलेश देशमुख यांचा कॉंग्रेसमध्ये प्रवेश



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** भाजपाचे युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस निखिलेश देशमुख यांनी भाजपा कार्यकर्त्यांसह कॉंग्रेसमध्ये खा. रविंद्र चव्हाण व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला आहे, यामुळे निवडणूक रणधुमाळी सुरू होताच राजकीय पक्षात घडोमोडींना वेग आला आहे.

नवीन नांदेड भागातील भाजपा युमोचे शहर सरचिटणीस निखलेश देशमुख हे मनपा निवडणूकमध्ये प्रभाग क्रमांक १९ मधील सर्वसाधारण महिलामधून आई कमल चंद्रकांत राव देशमुख यांनी भाजपा पक्षश्रेष्ठी यांच्याकडे मुलाखात दिली होती. तर गेल्या अनेक वर्षांपासून निष्ठावंत कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात सामाजिक कार्य केले होते.

# 'यशवंत' मधील प्रा. ओमप्रकाश गुंजकर राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदकांचे मानकरी



**नांदेड (प्रतिनिधी)–** श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत कनिष्ठ महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील प्रा. ओमप्रकाश नागनाथराव गुंजकर यांना सहाव्या महाराष्ट्र राज्य मास्टर गेम्स: २०२५ द्वारे आयोजित राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत दोन सुवर्णपदक व एक रौप्य पदक प्राप्त झाले आहे.

पिंपरी चिंचवड, पुणे येथे १३ व १४ डिसेंबर रोजी संपन्न झालेल्या स्पर्धेत ५० मीटर व शंभर मीटर बॅक स्ट्रोक स्पर्धेत प्रत्येकी एक सुवर्णपदक व ५० मीटर फ्रीस्टाइल स्पर्धेत रौप्य पदक पटकावले आहे.

या सुयशाबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांनी यथोचित सत्कार केला आणि नाशिक येथील राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत निवड झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या.

उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे, डॉ. हरिश्चंद्र पतंगे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. कबीर रबडे, पर्यवेक्षिका प्रा. वंदना बदने, डॉ. गौतम दुथडे, डॉ. एल. व्ही. पदमाराणी राव, डॉ. एस. एल. शिंदे, डॉ. अजय गव्हाणे, डॉ. विजय भोसले, डॉ. दिगंबर भोसले, डॉ. मनोज पैंजणे, प्रा. उत्तम केंद्रे, प्रा. राहुल टिचकुले, प्रा. नरेंद्र कंचटवार, डॉ. रामराज गावंडे, लेफ्टनंट प्रा. श्रीकांत सोमठाणकर, डॉ. एकनाथ मिरकुटे, डॉ. बी. जी. देशमुख, प्रा. अभिनंदन इंगोले, डॉ. मुकेश धर्मले, डॉ. वीरभद्र स्वामी, डॉ. विश्वाधार देशमुख, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील, अभय थेटे, नवनाथ धुमाळ, बालाजी देशमुख, सचिन धरणे, सोपान पुयड, साई मोरे, सेवानिवृत्त वनअधिकारी गोपाळराव गुंजकर, सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस निरीक्षक किशोर गुंजकर, प्राचार्य डॉ. श्रीरंग बोडके, श्रीकांत गुंजकर, बालाजी गाडे आदींनी अभिनंदन केले आहे.

# सेकंड लेव्हल ॲडव्हांस केडर कॅम्प नागपुरात होणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** सेकंड लेव्हल ॲडव्हान्स केडर कॅम्प यंदा नागपुरात होणार आहे, अशी माहिती एका पत्रकान्वये देण्यात आली आहे.

मराठा सेवा संघाचे संस्थापक क्रांतिपुरुष इंजि. पुरुषोत्तम खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तथा राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, इंजि. मधुकर मेहेकरे, सोमनाथ लडके यांच्या सहयोगाने लाईफ स्किल कोच शिवाजीराजे पाटील बाभळीकर, मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय प्रशिक्षक प्रा. संभाजी नवघरे, जिजाऊ ब्रिगेडच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. निर्मला पाटील, प्रा. डॉ. सुदर्शन तारख यांचा धमाल सेकंड लेव्हल एडव्हांस केडर कँप महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर येथील मराठा लॉन्स, जयताळा रिंगरोड, भाऊसाहेब सुर्वे लेआऊट स्थित बळीराजा संशोधन केंद्राच्या देखण्या



सभागृहात आयोजित करण्यात येणार आहे. २९ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ या चार दिवसात रिक्रॅप, उद्घाटन सोहळा, पंचसुत्री, संभाषण कौशल्य, वक्तृत्व कुशलता, नेतृत्व कौशल्य विकास, व्यक्तिमत्त्व विकास, पॉवर ऑफ सबकॉन्शियस माईंड, उत्तम मानवीय सहसंबंध, पॉवर ऑफ स्पोकन वर्डस, योगा एंड मेडिटेशन, आर्थिक साक्षरता, फॅमिली एंड चिल्ड्रन्स रिलेशनशिप, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, जीवनसाक्षरता, संगठन कौशल्य, इत्यादी विविध विषयांवर अभ्यासू, वास्तविक, सकारात्मक व जोशपुर्ण मार्गदर्शन उपस्थितांना लाभणार आहे.

योगा व मेडिटेशनच्या हिशोबाने लुज कंफर्टेबल क्लोथ, ऑरेंज सिटी नागपुर येथील चार दिवसांचा मुक्काम, इत्यादी बाबी लक्षात घेऊन सहभागी होताना पुर्ण तयारीनिशी येण्याचे आवाहन राष्ट्रीय प्रशिक्षण प्रमुख शिवाजीराजे पाटील यांनी केले आहे. सर्व पार्टिसिपेंन्टना २९ जानेवारी रोजी सकाळी ठिक अकरा वाजेपर्यंत नागपुरला पोहोचण्याची विनम्र सुचना प्रशिक्षक डॉ निर्मला पाटील यांनी केली आहे. चार दिवसीय निवासी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीराच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय महासचिव प्रदिप पाटील, कार्याध्यक्ष सुनील महाजन, डॉ संजय पाटील, जेष्ठ मार्गदर्शक प्रमोद महाजन, रविंद्र दाणी, विलास पाटील, गणेश कापसे, सोपानमामा क्षीरसागर, प्रा कपिल पिचेवार, उद्योजक आर एस पाटील, दिगंबर महाजन, प्रा मुकेश शिंदे, आदेश मुळे, गजानन वडजे, संयुक्ता देशमुख, डॉ मांगेराम चोपडे, सेवासिंग आर्य, जिलेसिंग खैंची, अंजली पाटील, कोमल देशमुख, पुजा हुले, मनिषा पाटील, शर्मिला पाटील, बालाजी बिरादार, लिंबराजबप्पा सुर्यवंशी, संतोष ठाकरे, शितल क्षोत्रिय, प्रल्हाद दुरपडे, इंजि निलेश सुर्यवंशी, आनंदराव माने, इत्यादी विविध क्षेत्रातील मान्यवर परिश्रम घेत आहेत. सहभागी होऊ इच्छिणाऱ्या प्रशिक्षणार्थींनी नागपूर प्रवासासाठी रेल्वे, विमानसेवा अथवा बसचे आरक्षण तथा शिबिरात सहभागी होण्यासाठी नोंदणी त्वरित करुन घेण्याचे आवाहन प्रा संभाजी नवघरे यांनी केले. ऐतिहासिक नागपूर केडर कैंपमध्ये ट्रेनिंग ऑफ ट्रेनर्स (टिओटी) संदर्भात सत्र समाविष्ट करण्यात आल्याची माहिती मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार यांनी यावेळी दिली.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# द्वेषमूलक भाषण: लोकशाहीतील स्वराचार

लोकशाहीची खरी ओळख म्हणजे अभिव्यक्तीस्वातंत्र्य. मतभेद, टीका, विरोध, प्रश्न विचारण्याची मोकळीक. याच आधारावर लोकशाही समाज उभा राहतो. मात्र, हीच अभिव्यक्ती जेव्हा द्वेष, तिरस्कार आणि हिंसेला खतपाणी घालते तेव्हा ती समाजाच्या ऐक्याला आणि शांततेला धक्का पोहोचवते. म्हणूनच द्वेषमूलक भाषण रोखण्याची गरज कोणीही नाकारू शकत नाही. परंतु या गरजेच्या नावाखाली जर कायदेच लोकशाहीच्या गळ्याभोवती आवळले गेले, तर तो उपचार रोगापेक्षा अधिक घातक ठरण्याचा धोका असतो. कर्नाटक सरकारने सादर केलेले 'कर्नाटक द्वेषमूलक भाषण आणि द्वेषगुन्हे (प्रतिबंध) विधेयक, २०२५' याच चिंतेला जन्म देणारे आहे. या विधेयकाचा उद्देश वरवर पाहता स्तुत्य वाटतो. समाजात द्वेष पसरवणारी भाषणे, लेखन, दृश्य माध्यमे किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील मजकूर रोखणे आणि त्यातून उद्भवणारे गुन्हे थांबवणे, हे नक्कीच आवश्यक आहे. मात्र, या विधेयकातील व्याख्या आणि तरतुदी इतक्या व्यापक, सैल आणि अस्पष्ट आहेत की त्यांचा गैरवापर होण्याची शक्यता अधिक आहे. 'द्वेषमूलक भाषण' आणि 'द्वेषगुन्हा' यांची व्याख्या करताना द्वेष, वैरभाव, असंतोष, वैमनस्य किंवा पूर्वग्रहदूषित हेतू अशा अत्यंत व्यक्तिनिष्ठ संज्ञांचा वापर करण्यात आला आहे. परिणामी, एखादी कठोर टीका, सरकारविरोधी मत, सामाजिक अन्यायाविरुद्धचा आवाज किंवा सत्ताधाऱ्यांना अप्रिय असलेले सत्यसुद्धा 'द्वेषमूलक' ठरवले जाऊ शकते. या विधेयकानुसार द्वेषगुन्ह्यासाठी एक ते सात वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि ५० हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. पुनरावृत्ती झाल्यास किमान दोन वर्षे ते दहा वर्षांपर्यंत शिक्षा आणि एक लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. इतक्या कठोर शिक्षांची तरतूद असताना, कायद्याची अचूकता, स्पष्टता आणि मर्यादा असणे अत्यावश्यक ठरते. अन्यथा हा कायदा गुन्हेगारांवर नव्हे, तर असहमत आवाजांवर कोसळण्याचा धोका निर्माण होतो. खरे तर भारतात द्वेषमूलक भाषण आणि सार्वजनिक शांततेला धोका निर्माण करणाऱ्या कृतींविरोधात आधीपासूनच अनेक केंद्रीय कायदे अस्तित्त्वात आहेत. भारतीय दंड संहिता, माहिती तंत्रज्ञान कायदा, तसेच विविध विशेष कायद्यांमधून अशा गुन्ह्यांवर कारवाईची तरतूद आहे. समस्या कायद्यांच्या अभावाची नाही, तर त्यांच्या अंमलबजावणीतील राजकीय इच्छाशक्तीच्या कमतरतेची आहे. अनेकदा सत्ताधाऱ्यांच्या राजकीय फायद्यासाठी द्वेषमूलक भाषणांकडे दुर्लक्ष केले जाते, तर विरोधकांचे किंवा टीकाकारांचे शब्द सूक्ष्मदर्शकाखाली ठेवले जातात. अल्पसंख्याकांच्या काही नेत्यांकडून द्वेषमूलक भाषण झाल्यास त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते आणि त्याविरुद्ध पोलिसांमध्ये किंवा न्यायालयात दाद मागण्याची देखील कोणी तसदी घेत नाही, हे लोकशाहीचे दुर्दैवच म्हणावे लागेल. अशा परिस्थितीत आणखी एक व्यापक आणि कठोर कायदा आणणे म्हणजे राज्यसत्तेला अधिक अधिकार देणे, जे लोकशाहीसाठी धोकादायक ठरू शकते. अगोदरच उपलब्ध असलेल्या कायद्यांचा जरी वापर केला तरी द्वेषमूलक भाषणावर पूर्णपणे अंकुश आणता येऊ शकतो, पण तसे करण्याची इच्छा बऱ्याच वेळा नसते. मुक्त समाजात भाषणावर नियंत्रण ठेवण्याचे एकमेव वैध कारण म्हणजे तात्काळ हिंसा किंवा सार्वजनिक सुव्यवस्थेला निर्माण होणारा स्पष्ट धोका. केवळ भावना दुखावल्या गेल्या, अस्वस्थता निर्माण झाली किंवा सत्तेला आव्हान दिले गेले, म्हणून भाषणावर गदा आणणे हे घटनात्मक मूल्यांच्या विरोधात आहे. मतभेद, वादविवाद आणि असहमती हे लोकशाहीचे प्राणवायू आहेत. तेच दाबले गेले तर लोकशाही केवळ नावापुरती उरेल. याच कारणामुळे कर्नाटक सरकारच्या या विधेयकावर नागरिक हक्क संघटना, विचारवंत आणि विरोधी पक्षांकडून तीव्र टीका होत आहे. या कायद्याचा हेतू चांगला असला, तरी त्याची मांडणी दडपशाहीकडे झुकणारी आहे. कार्यकारी यंत्रणेला प्रचंड अधिकार देणाऱ्या तरतुदी, अस्पष्ट व्याख्या आणि कठोर शिक्षा यांचा संगम हा अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर गंडांतर आणू शकतो. 'द्वेष रोखण्याच्या' नावाखाली 'विरोध रोखण्याचे' साधन बनण्याची या कायद्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकशाही टिकवायची असेल, तर कायदे करताना संतुलन राखणे आवश्यक आहे. द्वेषमूलक भाषणाला आळा घालणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच महत्त्वाचे आहे वैध टीका, सामाजिक प्रश्नांवरील चर्चा आणि सत्तेविरोधी आवाज यांचे संरक्षण करणे. त्याचप्रमाणे भाषण करणाऱ्यांनी देखील तारतम्य बाळगून, आपल्या शब्दांचा कोणता विपरीत परिणाम होऊ शकतो याचा विचार करूनच भाषण केले पाहिजे. कर्नाटक सरकारने या विधेयकाचा पुनर्विचार करणे अपरिहार्य आहे. स्पष्ट, मर्यादित आणि घटनात्मक चौकटीत बसणाऱ्या तरतुदी करूनच असा कायदा आणला गेला पाहिजे. अन्यथा चांगल्या हेतूने आणलेला हा कायदा लोकशाहीसाठी घातक ठरण्याची भीती कायम राहील.

# माळेगाव यात्रा : ग्रामीण संस्कृतीची प्रयोगशाळा!







मराठवाडा संतांची, वीरांची भूमी आहे. याच भूमीतील नांदेड जिल्ह्यात माळेगाव आहे. लोहा तालुक्यातील या गावात मोठी यात्रा भरते. ही यात्रा मार्गशीर्ष अमावास्येला सुरू होते. दक्षिण भारतात ही यात्रा अत्यंत प्रसिद्ध आहे. माळेगाव केवळ धार्मिक स्थळ नाही. ते ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देणारे मोठे व्यापारी केंद्र आहे. या यात्रेला आजपासून (ता. १८ ते २५ डिसेंबर) सुरुवात होत आहे. त्यानिमित्ताने या यात्रेवर प्रकाश टाकणारा हा लेख.

माळेगाव यात्रेला जवळपास चार शतकांची परंपरा आहे. मोगल, निजाम काळापासून या यात्रेला अनन्य साधारण महत्त्व आहे. ऐतिहासिक काळापासून माळेगाव घोड्यांच्या व्यापारासाठी प्रसिद्ध आहे. आजही तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील व्यापारी येथे येतात. या ठिकाणी महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या खंडोबाचे देखणे, सुंदर असे मंदिर आहे.

माळेगाव यात्रा म्हणजे लोककलांचे माहेरघरच. येथे कलगी-तुरा, वाघ्या-मुरळी, गोंधळ आणि भारूड सादर होतात. तमाशा, लावणी येथील मुख्य आकर्षण असते. नामांकित तमाशा फडांची जुगलबंदी येथे रंगते. तमाशासोबतच 'मौत का कुआँ' सारखे प्रकारही येथे दिसतात.

इतर यात्रांमध्ये प्रामुख्याने फक्त देवदर्शन असते. पण माळेगाव यात्रा वेगळी आहे. येथे कृषी प्रदर्शन आणि कुस्त्यांची दंगल पाहायला मिळते. पशु प्रदर्शन या यात्रेचे हृदय आहे. येथे हजारो जनावरांची खरेदी-विक्री होते. राजस्थानच्या पुष्कर मेळ्यानंतर घोड्यांच्या व्यापारासाठी ही दुसरी मोठी बाजारपेठ आहे. यात्रेत सर्वधर्मीय लोक आनंदाने सहभागी होतात. ही यात्रा म्हणजे उत्तम, असे सामाजिक सलोख्याचे प्रतीकच आहे.

माळेगाव यात्रा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पाच ते सात दिवसांतच येथे कोट्यवधींची उलाढाल होते. चेतक, मारवाडी, पंजाबी अशा उच्च जातीचे घोडे विक्रीला येतात. या घोड्यांची खरेदी-विक्री किंमत चकित करणारी असते. यासह येथे गाढवांचीही मोठी बाजारपेठ भरते. वीटभट्टी व्यावसायिक आणि परराज्यातील व्यापारी येथे गाढवे खरेदी करतात. याशिवाय उंट, बैल, गायी आणि शेळ्या-मेंढ्यांचीही विक्री होते. कृषी अवजारे आणि खाद्यपदार्थांचीही मोठी उलाढाल होते.

अडचणीच्या काळात ही यात्रा शेतकऱ्याला आधार देते. पशुधन विकून आलेला पैसा शेतीसाठी वापरला जातो. यात्रेत शेतकऱ्यांना नवीन बियाणे आणि तंत्रज्ञानाची माहिती मिळते. तसेच यात्रेतून स्थानिक मजुरांना रोजगार मिळतो. पूर्वी यात्रेत कृषी विषयक वस्तूंची देवाण-घेवाण (इरींशी ड्रींशा) होत असे. आता रोखीने आणि 'युपीआय'द्वारे व्यवहार होतात. पूर्वी बैलगाडीतून येणारे भाविक चारचाकी गाड्यांमधून येतात.

माळेगावची ही यात्रा केवळ उत्सव नाही. ती ग्रामीण संस्कृतीची एक प्रयोगशाळा आहे. आधुनिकीकरणाच्या काळातही यात्रेने आपली ओळख जपली आहे. हजारो हातांना काम देणारी ही यात्रा खऱ्या अर्थाने 'वैभवशाली' अशीच आहे.

**– डॉ. श्याम टरके,**
सहायक संचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय, लातूर

# अल्पसंख्याक हक्क : भारतीय लोकशाहीची सामाजिक व नैतिक कसोटी



भारत हा जगातील सर्वात वैविध्यपूर्ण समाजांपैकी एक आहे. विविध धर्म, भाषा, संस्कृती, पंथ, परंपरा आणि जीवनपद्धती यांचे सहअस्तित्व हेच भारतीय समाजाचे वैशिष्ट्य राहिले आहे. या बहुविधतेमुळे भारताला जागतिक स्तरावर एक वेगळी ओळख मिळाली असली, तरी याच विविधतेतून अनेक सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रश्नही निर्माण झाले आहेत. बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक या संकल्पना केवळ संख्येच्या आधारावर ठरलेल्या नसून त्या समाजातील सत्तासंबंध, संसाधनांवरील नियंत्रण आणि सामाजिक वर्चस्वाशी जोडलेल्या आहेत. १८ डिसेंबर रोजी साजरा होणारा 'अल्पसंख्याक हक्क दिन' हा केवळ एका विशिष्ट समुदायाच्या अधिकारांची आठवण करून देणारा औपचारिक दिवस नसून, तो भारतीय लोकशाहीच्या सामाजिक जाणीवेची, नैतिक अधिष्ठानाची आणि समतावादी मूल्यांची कसोटी पाहणारा महत्त्वाचा प्रसंग आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता, अल्पसंख्याक हक्कांचा प्रश्न हा संपूर्ण समाजाच्या आरोग्याशी, सामाजिक सलोख्याशी आणि लोकशाहीच्या भवितव्याशी थेट संबंधित आहे.

समाजशास्त्रात 'अल्पसंख्याक' ही संकल्पना केवळ संख्यात्मक नसून ती गुणात्मक आणि संरचनात्मक स्वरूपाची आहे. एखादा समुदाय संख्येने कमी असला तरी सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी असू शकतो, तसेच एखादा समुदाय संख्येने मोठा असूनही सामाजिकदृष्ट्या दुर्बल असू शकतो. त्यामुळे अल्पसंख्याकत्व हे केवळ आकड्यांवर ठरत नाही, तर त्या समुदायाचे सत्तासंबंधांतील स्थान, संसाधनांपर्यंत पोहोच आणि सामाजिक स्वीकार यावर अवलंबून असते. भारतीय समाजरचनेत बहुसंख्याक समुदायाकडे असलेले सांस्कृतिक वर्चस्व, राजकीय प्रभाव आणि आर्थिक साधनसंपत्ती यामुळे अल्पसंख्याक समुदाय अनेकदा काठावर ढकलले जातात. त्यामुळे अल्पसंख्याक हक्क ही संकल्पना 'विशेष सवलत' म्हणून न पाहता, समाजातील ऐतिहासिक आणि संरचनात्मक असमतोल दूर करण्याचा एक आवश्यक उपाय म्हणून पाहणे गरजेचे आहे.

भारतीय संविधानाने अल्पसंख्याक समुदायांना मूलभूत हक्कांच्या माध्यमातून व्यापक संरक्षण दिले आहे. धर्मस्वातंत्र्य, धार्मिक आचार पाळण्याचा अधिकार, सांस्कृतिक आणि भाषिक ओळख जपण्याचे स्वातंत्र्य, तसेच शैक्षणिक संस्था स्थापन व चालवण्याचा अधिकार या तरतुदी भारताच्या बहुसांस्कृतिक वास्तवाची घटनात्मक मान्यता आहेत. संविधान निर्मात्यांना हे स्पष्टपणे माहीत होते की, विविधतेने नटलेल्या समाजात जर सर्व समुदायांना समान संरक्षण दिले नाही, तर सामाजिक असंतोष आणि संघर्ष अपरिहार्य ठरतील. मात्र समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसून येते की, घटनात्मक तरतुदी आणि प्रत्यक्ष सामाजिक व्यवहार यांच्यात अनेकदा मोठी दरी असते. कायद्याच्या पुस्तकात असलेले हक्क प्रत्यक्ष जीवनात कितपत अंमलात येतात, हा प्रश्न आजही तितकाच महत्त्वाचा आहे.

अल्पसंख्याक समुदायांचे दैनंदिन सामाजिक अनुभव पाहिले, तर अनेकदा त्यांना उघड किंवा अप्रत्यक्ष भेदभावाचा सामना करावा लागतो. रोजगाराच्या संधी, शिक्षणातील प्रवेश, घरभाडे, सार्वजनिक सेवांचा वापर, सामाजिक स्वीकार अशा विविध क्षेत्रांत त्यांना वेगळ्या नजरेने पाहिले जाते, अशी भावना अनेक अल्पसंख्याक व्यक्ती व्यक्त करतात. समाजशास्त्र सांगते की, भेदभाव हा नेहमीच थेट आणि हिंसक स्वरूपात दिसून येत नाही; तो अनेकदा सूक्ष्म, अदृश्य आणि 'सामान्य' वाटणाऱ्या दैनंदिन व्यवहारांत लपलेला असतो. संशयाने पाहिले जाणे, सतत आपली निष्ठा सिद्ध करण्याची अपेक्षा ठेवली जाणे किंवा एखाद्या संपूर्ण समुदायाला काही व्यक्तींच्या कृतींसाठी दोषी ठरवले जाणे, हे सर्व सामाजिक भेदभावाचेच प्रकार आहेत. अशा अनुभवांमुळे अल्पसंख्याक समुदायांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढते आणि समाजातील एकात्मतेला तडे जातात.

लोकशाही ही केवळ निवडणुकांची प्रक्रिया नसून ती एक मूल्याधिष्ठित सामाजिक व्यवस्था आहे. बहुसंख्याकांचे मत हे लोकशाहीतील एक महत्त्वाचा घटक असला, तरी लोकशाहीची खरी ताकद अल्पसंख्याकांच्या हक्कांच्या संरक्षणात असते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता, बहुसंख्याकवाद आणि लोकशाही यामध्ये मूलभूत फरक आहे. बहुसंख्याकवाद म्हणजे बहुसंख्याकांच्या इच्छेचे वर्चस्व, तर लोकशाही म्हणजे सर्व घटकांचा सन्मान, सहभाग आणि सुरक्षितता. जर बहुसंख्याकांच्या नावाखाली अल्पसंख्याकांच्या अधिकारांवर मर्यादा येऊ लागल्या, तर लोकशाहीचे स्वरूप हळूहळू संकुचित होते. त्यामुळे अल्पसंख्याक हक्क दिन हा लोकशाहीच्या आत्मपरीक्षणाचा दिवस ठरतो.

समाजातील ध्रुवीकरण ही एक गंभीर सामाजिक प्रक्रिया आहे. धर्म, भाषा, संस्कृती किंवा ओळखीच्या आधारे समाजाचे 'आपण' आणि 'ते' असे विभाजन झाले, तर सामाजिक सलोखा धोक्यात येतो. समाजशास्त्रानुसार, अशा प्रकारचे ध्रुवीकरण अनेकदा राजकीय फायद्यासाठी प्रोत्साहित केले जाते, मात्र त्याचे दीर्घकालीन सामाजिक परिणाम अत्यंत घातक ठरतात. अल्पसंख्याक समुदायांना 'परके', 'संशयास्पद' किंवा 'धोकादायक' म्हणून पाहिले जाऊ लागले, तर त्यांच्या सामाजिक सहभागावर मर्यादा येतात. परिणामी दूरता वाढते, असुरक्षितता निर्माण होते आणि समाजात अविश्वासाचे वातावरण पसरते. अशा परिस्थितीत अल्पसंख्याक हक्क दिन हा समाजाला स्वतःकडे आरसा दाखवणारा दिवस ठरतो.

शिक्षण ही समाजपरिवर्तनाची सर्वात प्रभावी साधनेपैकी एक आहे. मात्र शिक्षण जर केवळ नोकरी, स्पर्धा आणि आर्थिक प्रगतीपुरते मर्यादित राहिले, तर समाजातील असमानता कमी होत नाही. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, शिक्षणातून मूल्यनिर्मिती होणे अत्यंत आवश्यक आहे. विविधतेचा सन्मान, सहिष्णुता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवी हक्कांची जाणीव ही मूल्ये शिक्षणातून रुजवली गेली, तर अल्पसंख्याकांविषयीचे गैरसमज आणि पूर्वग्रह कमी होऊ शकतात. अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, शिक्षकांची भूमिका आणि शैक्षणिक वातावरण हे सर्व समाजाच्या विचारसरणीवर प्रभाव टाकतात. त्यामुळे अल्पसंख्याक हक्क दिनाच्या निमित्ताने शिक्षणव्यवस्थेची सामाजिक भूमिका पुन्हा एकदा तपासण्याची गरज आहे.

माध्यमे ही आधुनिक समाजातील एक अत्यंत प्रभावी सामाजिक संस्था आहेत. वृत्तपत्रे, दूरदर्शन, सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमे ही केवळ माहिती देत नाहीत, तर समाजातील वास्तव कसे पाहिले जाईल, हेही ठरवतात. माध्यमांतून अल्पसंख्याक समुदायांचे चित्रण कसे केले जाते, यावर समाजाची मानसिकता अवलंबून असते. जर एखाद्या समुदायाचे सातत्याने नकारात्मक, सनसनाटी किंवा साचेबद्ध चित्रण झाले, तर समाजात भीती, संशय आणि द्वेष वाढण्याची शक्यता असते. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसून येते की, माध्यमे ही वास्तवाचे केवळ प्रतिबिंब नसून अनेकदा वास्तव घडवणारी शक्ती असतात. त्यामुळे माध्यमांनी अधिक जबाबदार, संतुलित आणि संवेदनशील भूमिका घेणे हे अल्पसंख्याक हक्कांच्या संरक्षणासाठी अत्यंत आवश्यक आहे.

कायदा आणि प्रशासन हे लोकशाही व्यवस्थेचे आधारस्तंभ आहेत. अल्पसंख्याक समुदायांना न्याय मिळेल, अशी खात्री वाटली, तर त्यांचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास दृढ होतो. मात्र न्यायप्रक्रिया जर संथ, गुंतागुंतीची किंवा पक्षपाती वाटली, तर असंतोष वाढतो. समाजशास्त्र स्पष्टपणे सांगते की, न्यायव्यवस्थेवरील विश्वास हा सामाजिक स्थैर्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. अल्पसंख्याक हक्कांचे संरक्षण करताना कायद्याची अंमलबजावणी ही केवळ औपचारिक न राहता, मानवी आणि समतावादी दृष्टिकोनातून होणे गरजेचे आहे. न्याय म्हणजे केवळ शिक्षा देणे नव्हे, तर समाजातील विश्वास आणि सलोखा पुनर्स्थापित करण्याची प्रक्रिया आहे.

जागतिकीकरण, शहरीकरण आणि स्थलांतर या प्रक्रियांमुळे भारतीय समाज झपाट्याने बदलत आहे. या बदलांमुळे काही अल्पसंख्याक समुदायांना नव्या संधी उपलब्ध होत असल्या, तरी अनेकांना नव्या प्रकारच्या असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे. रोजगारातील स्पर्धा, सांस्कृतिक ओळखीचा प्रश्न, सामाजिक स्वीकार आणि आर्थिक विषमता या मुद्द्यांवर ताण वाढत आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले असता, बदलाच्या काळात दुर्बल घटक अधिक प्रभावित होतात. त्यामुळे अल्पसंख्याक हक्क दिन हा बदलत्या सामाजिक वास्तवाचा सखोल विचार करण्याचा आणि समतावादी भविष्यासाठी दिशा ठरवण्याचा दिवस ठरतो.

अल्पसंख्याक हक्कांचा प्रश्न हा केवळ अल्पसंख्याक समुदायांपुरता मर्यादित नाही. तो बहुसंख्याक समाजालाही आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडतो. विविधतेचा स्वीकार म्हणजे बहुसंख्याकांनी आपली ओळख गमावणे नव्हे, तर ती अधिक व्यापक, समृद्ध आणि मानवी बनवणे होय. समाजशास्त्र सांगते की, ज्या समाजात विविधतेचा सन्मान केला जातो, तिथे सर्जनशीलता, सांस्कृतिक समृद्धी आणि सामाजिक स्थैर्य वाढते. उलट ज्या समाजात एकसारखेपणाचा आग्रह धरला जातो, तिथे असंतोष, दूरता आणि संघर्ष वाढण्याची शक्यता असते.

१८ डिसेंबरचा 'अल्पसंख्याक हक्क दिन' आपल्याला हे ठामपणे स्मरण करून देतो की, लोकशाही ही केवळ राजकीय व्यवस्था नसून ती एक सतत चालणारी सामाजिक प्रक्रिया आहे. अल्पसंख्याक समुदाय भयमुक्त वातावरणात, आत्मसन्मानाने आणि समान संधींसह जगू शकतील, तेव्हाच भारतीय लोकशाही खऱ्या अर्थाने सशक्त ठरेल. अल्पसंख्याक हक्कांचे रक्षण करणे ही केवळ शासनाची किंवा न्यायव्यवस्थेची जबाबदारी नसून, प्रत्येक सजग नागरिकाची सामाजिक आणि नैतिक जबाबदारी आहे. कारण ज्या समाजात सर्व घटकांना समान सन्मान, समान हक्क आणि समान संधी मिळतात, तोच समाज खऱ्या अर्थाने न्याय्य, संवेदनशील आणि टिकाऊ लोकशाही समाज ठरतो.

**–डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली

# हरित ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक आणि रोजगाराच्या संधी

भारताने २०३० पर्यंत ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर होण्यासाठी नवीन पंचवार्षिक योजना तयार केली आहे. या योजनेच्या मदतीने, देश ५०० गिगावॅट (ऋथ) गैर-जीवाश्म इंधनावर आधारित विजेचे उद्दिष्ट साध्य करू शकेल. केंद्र सरकारने पुढील पाच वर्षांसाठी प्रतिवर्षी ५० गिगावॅट अक्षय ऊर्जा क्षमतेसाठी निविदा मागवल्या आहेत. इतकेच नाही तर, 'इंटर-स्टेट ट्रांसमिशन' (आंतर-राज्य पारेषण -खडढड) अक्षय ऊर्जा क्षमतेसाठीच्या या वार्षिक बोलींमध्ये प्रतिवर्षी किमान १० गिगावॅट पवन ऊर्जा क्षमता स्थापित करणे देखील समाविष्ट असेल. ही घोषणा अल्पकालीन आणि दीर्घकालीन अक्षय ऊर्जा क्षमता जोडण्याच्या दृष्टीने आणि २०३० पर्यंत ५०० गिगावॅट गैर-जीवाश्म इंधन क्षमतेचे लक्ष्य साध्य करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाते. भारत जगातील ऊर्जा संक्रमणामध्ये जागतिक नेता म्हणून उदयास येत आहे. अक्षय ऊर्जेच्या क्षेत्रात आपण केलेल्या प्रगतीवरून हे स्पष्ट होते.



नवीकरणीय ऊर्जा क्षेत्र देखील रोजगाराच्या दृष्टिकोनातून आशादायक दिसते. हवामान बदलाचे धोके रोखण्यासाठी संपूर्ण जग या क्षेत्राचा विकास करण्यात व्यस्त असताना, भारताने या संसाधनाच्या विकासात चांगले यश मिळवले आहे. गेल्या दहा वर्षांत देशाने अक्षय ऊर्जा निर्मितीची क्षमता पाचपट वाढवली आहे. यासोबतच ऊर्जा उत्पादनाच्या क्षेत्रात २०३० पर्यंत नवीन उद्दिष्टेही निश्चित करण्यात आली आहेत. एका अहवालानुसार, नवीन उद्दिष्ट पूर्ण करण्यात यश मिळाले तर २०३० पर्यंत या क्षेत्रात सुमारे १५ लाख रोजगार निर्माण होतील. चीन, ब्राझील आणि अमेरिकेनंतर अक्षय ऊर्जा क्षेत्रात रोजगार निर्मितीच्या बाबतीत भारताचा जगात चौथा क्रमांक लागतो. संपूर्ण जगात नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांपैकी ५.७ टक्के लोक भारतात आहेत. इंटरनॅशनल रिन्यूएबल एनर्जी एजन्सी (खठएछ) च्या अहवालानुसार, २०१४ पर्यंत अक्षय ऊर्जा क्षेत्राने भारतात चार लाख रोजगार निर्माण केले होते.

वास्तविक, भारतामध्ये ऊर्जा क्षेत्रात विकासाची भरपूर क्षमता आहे आणि या क्षेत्रात जाण्यासाठी विद्यार्थ्यांना काही विशेष अभ्यास करणे आवश्यक आहे. ऊर्जा क्षेत्रात बी.टेक पॉवर, एमबीए ऑइल अँड गॅस, एमए एनर्जी इकॉनॉमिक्स, सोलर एनर्जी इत्यादी विषयांशी संबंधित अनेक कोर्सेस आहेत, परंतु आगामी काळात सर्वात मोठी क्षमता सौरऊर्जेमध्ये आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, भारताला पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्यासाठी ऊर्जा क्षेत्रामध्ये सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे. गुंतवणुकीबद्दल बोलायचे झाले तर २००० ते २०१९ दरम्यान भारताच्या ऊर्जा क्षेत्रात १४.३२ अब्ज डॉलरची परकीय गुंतवणूक आली आहे. सरकार या क्षेत्राकडे विशेष लक्ष देत आहे, त्यामुळे आगामी काळात या क्षेत्रातील गुंतवणूक आणखी वाढेल. त्यामुळे नोकरीच्या शक्यताही वाढतील. भारत सरकारने अक्षय ऊर्जा (सौर ऊर्जा, पवन ऊर्जा इ.) ची क्षमता २०२२ पर्यंत १७५ गिगावॅट पर्यंत वाढवली आहे.

भारतीय हरित ऊर्जेशी संबंधित अनेक क्षेत्रे आहेत ज्यात गुंतवणुकीची नितांत गरज आहे. हरित ऊर्जेचे उत्पादन हा त्याचा एक पैलू आहे. गुंतवणुकीसाठी अनेक क्षेत्रे आहेत, पुरवठा साखळी उभारण्यापासून ते सौर पॅनेल आणि पवन टर्बाइन तयार करणे, वितरित ऊर्जा प्रकल्पांमध्ये ते स्थापित करणे आणि आवश्यक आधुनिक ग्रिड उभारणे. यामध्ये सॉफ्टवेअरवरील अवलंबित्वही वाढले आहे. इथे गुंतवणुकीचीही भरपूर शक्यता आहे. खरं तर, पॉवर ग्रीड सुरळीतपणे कार्यरत आहे याची खात्री करण्यासाठी ग्रीन एनर्जीला सॉफ्टवेअरची आवश्यकता असते. या परिसराच्या विकासासाठी हे महत्त्वाचे आहे.

जगभरातील देशांना कोळसा आणि इतर जीवाश्म इंधनांपासून दूर जाण्याची आणि हरित ऊर्जेला पाठिंबा देण्याची अनेक कारणे आहेत. हरित ऊर्जा क्षेत्रात देशी-विदेशी कंपन्यांच्या गुंतवणुकीची प्रचंड क्षमता आहे. ऊर्जा संक्रमणाचा वेग ज्या प्रकारे वाढत आहे, ते पाहता आगामी काळात भांडवली प्रवाहात वाढ होणार आहे. भारतीय हरित ऊर्जा क्षेत्रातील परकीय गुंतवणूक २०१४ पासून सातत्याने ४,१०० कोटी रुपयांच्या वर राहिली आहे, परंतु २०१७ पासून दरवर्षी १ अब्ज डॉलर (रु. ८,२०० कोटी) चा टप्पा ओलांडत आहे. जगभरातील भांडवली बाजार नियामक कारणास्तव तसेच दीर्घकालीन फायद्यांसाठी हरित तंत्रज्ञानामध्ये गुंतवणुकीकडे वळत आहेत. याचा अर्थ हरित ऊर्जेमध्ये उपलब्ध भांडवल गुंतवण्याचे धोके कमी होतात.

एक पैलू असा आहे की, सध्या भारताची उर्जेवर इतर देशांवरील अवलंबित्व खूप जास्त आहे. ऊर्जा क्षेत्रात देशाला स्वावलंबी बनवण्यासाठी अनेक उपक्रम राबवले जात आहेत. या क्रमाने, अक्षय ऊर्जा महत्त्वाची भूमिका बजावत आहे, ज्यासाठी सरकार सौर उर्जेच्या क्षेत्रात खूप काम करत आहे. भारताने २०७० पर्यंत कार्बन उत्सर्जन शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, ज्यासाठी नूतनीकरणक्षम स्रोतांमधून सुमारे ५० टक्के ऊर्जा निर्मिती करण्याचे मोठे लक्ष्य आहे. भारताने २०४० पर्यंत नवीकरणीय स्रोतांमधून १५,८२० टेरावॅट-तास वीज निर्मितीचे उद्दिष्ट ठेवले आहे. अशा स्थितीत हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सौरऊर्जा महत्त्वाची भूमिका बजावू शकते. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध कंपन्या सौरऊर्जेच्या क्षेत्रात वेगाने काम करत आहेत. त्यामुळे या क्षेत्रातील कंपन्यांमध्ये अजूनही चांगली वाढ होताना दिसत आहे. आगामी काळात या कंपन्यांच्या वाढीला वेग आल्याने भारत ऊर्जा क्षेत्रातील सर्व उद्दिष्टे यशस्वीपणे साध्य करेल.

**–मच्छिंद्र ऐनापुरे**
जत जि. सांगली

# जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांबाबत अधिनियमनात सुधारणा करण्याचा मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी)** – सध्या राज्यात महानगरपालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी रंगली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्णयानुसार महापालिकांच्या निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होईल

तर १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर केला जाईल. यावेली मुंबई महापालिकेची निवडणूक ही इतर म हापालिकांच्या निवडणुकीसोबतच होणार आहे. असे असतानाच आता राज्य सरकारने निवडणूक अधिनियम १९६१ या कायद्यात मोठी सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. या कायद्यात सुधारणेचा अध्यादेश काढला जाणार असून या अध्यादेशाद्वारे जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत उमेदवारी अर्जाबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम राहील, अशी तरतूद करण्यात आली आहे. सोबतच गड-किल्ल्यांप्रम ाणेच राज्य संरक्षित स्मारक परिसरातील अतिक्रमणे रोखण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १४ (२) मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्यातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका वेळेत आणि कालबध्द रितीने व्हाव्यात या दृष्टीने हा निर्णय महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियमातील कलम १४ मध्ये, पोट-कलम (२) अंतर्गत उमेदवारी अर्ज (नामनिर्देशनपत्रे) स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयासमोर अपील दाखल करता येत होते. मात्र विविध जिल्हा न्यायालयांम ध्ये वेगवेगळ्या कालावधीसाठी अशी अनेक अपीले प्रलंबित राहत असल्याने निवडणुका कालबद्धरित्या घेणे शक्य होत नसल्याने हा निर्णय घेण्यात आला. याबाबत राज्य निवडणूक आयोगाने शासनास या तरतुदी वगळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविला आहे.

त्या अनुषंगाने राज्य शासनास अशा निवडणुकांबाबत नियम करता येतील, तसेच उमेदवारी अर्ज (नामनिर्देशनपत्रे) स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल, अशी कलमे यात समाविष्ट करण्यात आली आहे. याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२५ काढण्यास बैठकीत मंजूरी देण्यात आली.

राज्यातील गड-किल्ल्यांप्रमाणेच राज्य संरक्षित स्मारकांच्या ठिकाणांवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयानुसार सांस्कृतिक कार्य विभागाच्या यापूर्वीच्या (दि. २० जानेवारी २०२५) शासन निर्णयातील गड-किल्ल्यांवरील अतिक्रमणे काढण्याबाबतच्या तरतूदींची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. यामध्ये आता राज्य संरक्षित स्मारकांचाही सम ावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील सर्व गड-किल्ले तसेच राज्य संरक्षित स्मारकांवरील अतिक्रमणे काढून टाकण्यासाठी व भविष्यातील अतिक्रमणे रोखण्यासाठी राज्यस्तरीय समिती गठीत करण्यास मंत्रिमंडळाने म ान्यता दिली आहे. समितीचे सांस्कृतिक कार्य मंत्री अध्यक्ष असतील. तर समि तीमध्ये महसूल मंत्री, ग्रामविकास मंत्री, पर्यटन मंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री, वन मंत्री, बंदरे व विकास मंत्री तसेच संबंधित विभागांचे सचिव, प्रधान सचिव किंवा अपर मुख्य सचिव यांचा समावेश असणार आहे.

राज्यस्तरीय समितीमध्ये चार निमंत्रित सदस्यांचा समावेश करण्यास तसेच प्रत्येक जिल्ह्यात गठीत करण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय समितीमध्ये चार अशासकीय सदस्यांचा समावेश करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. हे अशासकीय सदस्य गड-किल्ले व राज्य संरक्षित स्मारकांचे अभ्यासक असावेत किंवा संरक्षण व संवर्धनाच्या क्षेत्रात कार्यरत असलेली व्यक्ती अथवा स्वयंसेवी संस्था असावी, अशी अट ठेवण्यात आली आहे. जिल्ह्यातील गड-किल्ले व राज्य संरक्षित स्मारकांवरील अतिक्रमणे रोखणे व ती काढून टाकण्याची कारवाई संबंधित जिल्हाधिकारी यांना त्या-त्या जमिनीच्या मालकीच्या विभागाच्या समन्वयाने करावी लागणार आहे. तसेच यासाठीचा खर्च जिल्हा नियोजन व विकास निधीमधून करता येणार आहे.

## टी.सी. हरवली

माझी शोभा पांडुरंग कांबळे या नावाची नववी पासची टी. सी. एरंडेश्वर ते नांदेड बस प्रवासात हरवले आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- रा. लेबर कॉलनी, घर नं. २७/८४, नांदेड

(पान २ वरून...)

| अ.क्र. | नेमुन देण्यांत आलेले प्रभाग क्र. व आरक्षणाचा तपशील | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे ठिकाण | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव व पदनाम | सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नांव व पदनाम | मतमोजणीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७. | **प्रभाग क्र. १९ वसरणी / कौठा**<br>अ-अनु. जाती<br>ब-अनु. जमाती<br>क-नामाप्र महिला<br>ड-सर्वसाधारण महिला<br>**प्रभाग क्र. २० सिडको / वाघाळा**<br>अ-अनु. जाती महिला<br>ब-नामाप्र महिला<br>क-नामाप्र<br>ड-सर्वसाधारण महिला<br>ई-सर्वसाधारण | क्षेत्रिय कार्यालय क्र. ६ सिडको, नांदेड | श्रीमती स्वाती दाभाडे, उपविभागीय अधिकारी, धर्माबाद, | १. श्री सय्यद उमर अहेमद हुसेन, तहसिलदार हदगांव<br>२. श्री मिर्झा फरतउल्लाह बेग, क्षेत्रिय अधिकारी क्र. ६ मनपा नांदेड<br>३. श्रीमती शिवकन्या जायभाये, उपअभियंता, मनपा नांदेड | माहिती व तंत्रज्ञान इमारत शासकिय तंत्रनिकेतन नांदेड. |

उपरोक्त सर्व निवडणूक निर्णय अधिकारी त्यांचे कडे निर्णयासाठी सुपूर्द करण्यांत आलेल्या रकाना क्र. २ मधील संबंधित प्रभागाची नामनिर्देशन पत्र दिनांक २३.१२.२०२५ (मंगळवार) ते ३०.१२.२०२५ (मंगळवार) रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजे पर्यन्त स्तंभ क्र. ३ मध्ये नमुद केलेल्या त्यांच्या संबंधित कार्यालयात स्विकारतील. (गुरुवार दिनांक २५.१२.२०२५ व रविवार दिनांक २८.१२.२०२५ रोजी नामनिर्देशन पत्रे स्विकारण्यांत येणार नाहीत.)

नामनिर्देशनपत्र स्विकारण्याची प्रक्रिया पारंपारिक पध्दतीने **(Offline)** होणार आहे..

ठिकाण : नांदेड
दिनांक : १८.१२.२०२५

स्वाक्षरीत/-
**डॉ. महेशकुमार डोईफोडे**
आयुक्त तथा निवडणूक अधिकारी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## Change In Name

My old Name is **SAYYED SADIQ** which now I am Changing as New Name **SAYYAD SADIQ SAYYAD HUSAIN** Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same,

**Sign by SAYYAD SADIQ SAYYAD HUSAIN**

Address: **H No. 9-7-1434 Degloor Naka Road Near Zulekha Masjid Laxmi Nagar Itwara Nanded 431604 Mob . 8149112138**

## Change In Name

My old Name is ABDUL GAFFAR ABDUL RAZZAQ which now am changing as new name ABDUL GAFFAR Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same

Address: H. No. 9-6-1270 Rahemat Nagar, Degloor Naka, Nanded-431604
Mo. No. 9823236139

## Change In Name

My old Name is: SHAIKH AFROZ which now am changing as new name SHAIKH AFROZ SHAIKH MAHEBUB Fenceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same

Address: SK MAHEBOOB, 1-7-1827, Peer Burhan Nagar, Galli No. 18, Near Salman Bekri, Taroda BK, Nanded 431605, Maharashtra,
Mob No: +919049936420

## जाहीर प्रगटन

मौजे तरोडा (बु.) ता.जि.नांदेड मनपा हद्दीतील शेत गट नं. २०८ मधील प्लॉट नं. ५९ साईज १५० चौ.मी.चा प्लॉट शिल्पा नागोराव बैनवाड यांचेकडून अजय नागोराव बैनवाड व इतर यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयानापोटी काही रक्कम दिली आहे.

प्लॉची चतुःसिमा - पूर्वेस - ९ मीटर रोड, पश्चिमेस - प्लॉट नं. ६०, दक्षिणेस - प्लॉट नं. ५८, उत्तरेस - ६ मीटर रूंद रोड.

तरी वरील चतुःसिमेच्या आलीत प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा किंवा आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी कर्जबोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनगर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जणार नाही व नंतर प्लॉटचे खेरदीखत करून घेण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**मारोती रामराव चौतमाल**
**सौ. वंदना विश्वनाथराव आरमाळकर**
**रा. यशवंतनगर, नांदेड**
**मो.नं. ९४२३४०१४४२**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.१०९ दि.१५/१२/२५

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०८ मालमत्ता क्र. ६०/२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, बाहोद्दीन रफियोद्दीन खतीच रा. परमेश्वर गल्ली ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ६०/२ वार्ड न. ०८ श्री सलमान खान फिरोज खान यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. २५१२/२०२५ दि. ............ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - गायकवाड, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - डोल्हारीकर, उत्तरेस - रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.११० दि.१६/१२/२५

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०९ मालमत्ता क्र. १५३ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, हमीदाबी शेख हजुरा रा. नेहरूनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १५३ वार्ड न. ०९ गंगासागर मुकुंद सुरोशे यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ६४३/२०२५ दि. ............ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - बंडेवार, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - सिताराम कोंडबा, उत्तरेस - विजय.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.१११ दि.१६/१२/२५

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०७ मालमत्ता क्र. ४८४ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, पुष्पा चांदु डोनेराव रा. गणेशवाडी ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४८४ वार्ड न. ०७ शेख वहीद शेख अस्लम शेख हमीद यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १४६१/२०२५ दि. ............ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - प्लॉट क्र. १८, पश्चिमेस - सर्व्हे नं. १४२/१, दक्षिणेस - प्लॉट क्र. २६, उत्तरेस - कॉलनी रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.११२ दि.१६/१२/२५

नाव परिवर्तन वार्ड क्र. २१मालमत्ता क्र. ५२१ व ५३० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सेमु लक्ष्मी पतलेवाड रा. ---- ता.---- यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५२१ व ५३० वार्ड न. २१ बाबुराव लच्छमा ओबीवाड यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १४५०/२०२५ दि. ............ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - बोअरकडे जाणारा रस्ता, पश्चिमेस - ३० फुटाचा रस्ता, दक्षिणेस - प्लॉट क्र. ६४ व ७५, उत्तरेस - प्लॉट क्र. ६६ व ६३.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.११३ दि.१६/१२/२५

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०२ मालमत्ता क्र. १२८/२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, राजुसिंह शंकरसिंह ठाकूर, भगवानसिंह नारायणसिंह ठाकूर रा. बजरंग चौक ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १२८/२ वार्ड न. ०२ सुभद्राबाई शंकरसिंग रघुवंशी यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १५१२/२०२५ दि. ............ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - राजुसिंग ठाकूर, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - प्रमोद देशपांडे, उत्तरेस - भगवान आडे.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.११४ दि.....

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०१ मालमत्ता क्र. ८० या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, कल्याण उत्तमराव मारुडवार व इतर रा. हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ८० वार्ड न. ०१ उत्तम विठ्ठलराव मारुडवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ६११२/२०२५ दि. ............ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - अंकुश बालाजी, पश्चिमेस - सतीष बालाजी, दक्षिणेस - सरकारी रस्ता, उत्तरेस - सतीष मामीडवार.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## Change In Name

I FARUKH MAHEBUB KHAN PATHAN (New Name) S/O,D/O.,W/O MAHEBUBKHAN GAFFARKHAN PATHAN Resident of Dagdapur Ta. Biloli Dist. Nanded 431710 Maharashtra Changed my name from FARUKH MAHEBUB PATHAN (New Name) to FARUKH MAHEBUB KHAN PATHAN (New Name) S/O,D/O.,W/O. MAHEBUBKHAN GAFFARKHAN PATHAN for all purposes.

For Minors

We Father name and Mother Name parents of Child New Name resident of Address changed our son's / daughter's name from Child old name to Child new name for all purposes.

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.१०३ दि.११/१२/२५

नाव परिवर्तन वार्ड क्र. ११ मालमत्ता क्र. ५६४ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, श्री माजीद खालेद नाईक रा. शेवाळा कळमनुरी ता.-- यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५६४ वार्ड न. १८ श्री अब्दुल मतीन अब्दुल मलीक यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १४८४/२०२५ दि. ............ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - सर्व्हे नं. २५६/१, पश्चिमेस - ३० फुटाचा रस्ता, दक्षिणेस - प्लॉट क्र. ४०, उत्तरेस - प्लॉट क्र. ३८.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.१०४ दि.११/१२/२५

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८अ मालमत्ता क्र. ६६६ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, श्री रेशमा बेगम शेख फारुख रा. जवळा बाजार मुधोळ ता.निर्मल यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ६६६ वार्ड न. १८ अ मिर्झा साजीदाबेग अमीरबेग यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १४४३/२०२५ दि. ............ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - प्लॉट क्र. ६९, पश्चिमेस - २० फुटाचा रस्ता, दक्षिणेस - प्लॉट क्र. ६१, उत्तरेस - प्लॉट क्र. ५९.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.१०५ दि.११/१२/२५

नाव परिवर्तन वार्ड क्र. ११ मालमत्ता क्र. २२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, श्री मोहमद अफरोज मोहमद पाशा रा. बाजार ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २२ वार्ड न. ११ श्री अब्दुल अजीज अब्दुल खदीर यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १३२४/२०२५ दि. ............ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - कॉलनी रस्ता, पश्चिमेस - जलील खान, दक्षिणेस - कॉलनी रस्ता, उत्तरेस - आनंद माने.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.१०६ दि.१५/१२/२५

नाव परिवर्तन वार्ड क्र. १०अ मालमत्ता क्र. ६४ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, श्री रिजवान खान मिर्झा खान पठाण रा. रहिम कॉलनी ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ६४ वार्ड न. १०अ श्री सईद अहेमद अब्दुल रब यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १३५४/२०२५ दि. ............ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - बाहोद्दिन यांचे घर, पश्चिमेस - शेख ईलियास यांचे घर, दक्षिणेस - सईद अहेमद, उत्तरेस - रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.१०७ दि.१५/१२/२५

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०७ मालमत्ता क्र. ५०५ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, अनिता श्याम गादेवार रा. नेहरूनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५०५ वार्ड न. ०७ श्री शेख वहिद अस्लम शेख हमीद यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १४४९/२०२५ दि. ............ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - प्लॉट क्र. ४०, पश्चिमेस - प्लॉट क्र. ३८, दक्षिणेस - शेख सलीम, उत्तरेस - रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.१०८ दि.१७/१२/२५

नाव परिवर्तन वार्ड क्र. १५ मालमत्ता क्र. ४२६ व ४२७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, परमेश्वर शंकरराव हेंद्रे रा. शिवाजीनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४२६ व ४२७ वार्ड न. १५ श्री जयवंतराव नागोराव दळवे यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १४८४/२०२५ दि. ............ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - प्लॉट क्र. ६६, पश्चिमेस - कॉलनी रस्ता, दक्षिणेस - प्लॉट क्र. ३४ व ३५, उत्तरेस - कॉलनी रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## Change In Name

My Old Name is MOHAMMED SUMER MD ASHFAQ ALI which now I am changing to (New Name) MOHAMMED SUMAIR ALI ASHFAQUE ALI Hence forth my all correspondence be done as per my New Name. Please consider the same.

Address-S/o ASHFAQUE ALI PLOT No. 33, GAUSIYA MANZIL CHAITNYA NAGAR NANDED-431605


## Change In Name

My Old Name is Supriya Maruti Umrajkar which now I am changing as New Name Supriya Maroti Umrajkar Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address :- H.No. 11-2-249/1A, 27, Near Canser Hospital, Yashoda Nagar, Kautha Po. Cidko, New Nanded Dist. Nanded 431603
Mo.No. 8788551031

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



### मुदखेडमध्ये अवैध वाहतूक विरोधात जनआक्रोश

## शहर कडकडीत बंद; उमरी चौकात रास्तारोको

### तहसील कार्यालयावर धडकला मोर्चा; तहसील प्रशासनाला निवेदन





**मुदखेड (प्रतिनिधी)–** नागरी विकास कृती समितीच्या वतीने भरधाव वेगातील अवैध वाळू तस्करी वाहनावर कठोर कारवाई करण्यासाठी तसेच भरधाव हायवाच्या धडकेत ठार झालेल्या संतोष टाक यांच्या स्मरणार्थ बुधवार, दि. १७ डिसेंबर रोजी जनआक्रोश व्यक्त करण्यात आला. या घटनेच्या निषेधार्थ बाजारपेठ कडकडीत बंद ठेवून रास्तारोको करण्यात आला. तसेच तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला.

तहसील प्रशासनाला अवैध धंदे तत्काळ बंद करण्यासाठी लेखी निवेदन देण्यात आले. या विरोधात कठोर कारवाई करण्याचे आश्वासन तहसील प्रशासनाने दिले आहे.

बारड मार्गे मुदखेडकडे येत असताना सीता नदीच्या वळणावर भरधाव वेगातील अवैध वाहतूक करणाऱ्या हायवाने दुचाकीला जोराची धडक दिली होती. या धडकेत सुवर्ण कारागीर संतोष टाक यांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात निष्पाप करागिराला जीव गमावा लागल्याने या विरोधात नागरी विकास कृती समितीच्या वतीने शहर बंदची हाक देण्यात आली होती. शहरातून दररोज वाळू माफीयांची वाहने राजरोशपणे वेगात जात असल्याने अपघाताच्या घटना सातत्याने घडल्या. वाळू माफियांना रोखण्यात प्रशासनाला अपयश येत असल्याच्या विरोधात प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच अवैध धंदे रोखण्यासाठी जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चात शहरातील सुज्ञान नागरिक, सर्वपक्षीय पदाधिकारी सहभागी झाले होते. अत्यावश्यक सेवा वगळता संपूर्ण बाजारपेठ व्यापाऱ्यांनी कडकडीत बंद ठेवून निषेध नोंदविला. उमरी चौकात शहर विकास कृती समितीच्या वतीने न्याय मिळावा यासाठी रास्तारोको करण्यात आला होता. यावेळी प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. तहसील कार्यालयावर मोर्चा काढून तहसीलदार आनंद देऊळगावकर यांना अवैध धंदे बंद करण्यासंदर्भात लेखी निवेदन देण्यात आले. अवैध वाळू तस्करांचा बंदोबस्त करण्यात यावा, हरित लवाजा ग्रीन झोन पट्ट्यातील वाळू घाट त्वरित बंद करण्यात यावेत, भरगाव वेगात जाणाऱ्या वाहनावर कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीचे निवेदन देण्यात आले.

यावेळी नागरिक कृती समितीला विना परवाना वाहनावर कठोर कारवाई करण्याचे तसेच वाळू तस्करांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे ठोस आश्वासन तहसील प्रशासनाने दिले आहे. अपघातातील हायवाचा शोध घेण्यासाठी वाळू तस्करांच्या हायवा ताब्यात घेऊन चौकशी केली जात आहे.

## खा. अशोक चव्हाण वेगळा राजकीय प्रयोग करून मतविभाजन करणार!

### वंचित बहुजन आघाडीचा आरोप

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणुकीत खा. अशोक चव्हाण वेगळा राजकीय प्रयोग करून मतविभाजन करणार असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेत केला.

महानगर निवडणूकपूर्व आढावा बैठकीनंतर आयोजित या पत्रकार परिषदेत वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष फारुक अहमद, माजी निवडणूक समितीचे प्रशांत इंगोले, शिवा नरंगले, शाम कांबळे, महानगराध्यक्ष विठ्ठल गायकवाड, युवक जिल्हाध्यक्ष आकाश जोंधळे, युवक महानगराध्यक्ष राहुल सोनसळे, सुखासिंग टाक, महानगर महासचिव अमृत नरंगलकर, सम्यकचे राज्य प्रवक्ते कैलास वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना फारुक अहमद म्हणाले की, नांदेडमध्ये खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवायचे असेल तर नवीन, तरुण आणि संवेदनशील नगरसेवक निवडून आणावे लागतील. जुन्या पिढीतल्या अनेक नगरसेवकांना गुत्तेदारी करण्याची सवय लागल्याने शहरातील अनेक भाग आजही मूलभूत सुविधांपासून वंचित असून, नागरी वस्त्या घाणीच्या आणि दुर्लक्षाच्या साम्राज्यात ढकलल्या गेल्या आहेत.

तसेच भाजपमध्ये गेलेले अशोक चव्हाण नांदेडमध्ये पुन्हा एकदा विविध राजकीय प्रयोग करून सेक्युलर मतांचे विभाजन करण्याचा ट्रॅप लावण्याची शक्यता असल्याचा इशारा देत फारुक अहमद म्हणाले, नांदेडला या राजकीय सापळ्यातून मुक्त करण्याची संधी वंचित बहुजन आघाडी देऊ शकते. त्यामुळे मतांची विभागणी रोखा, धनशक्तीला पायबंद घाला आणि या निवडणुकीत सामान्य नागरिकांच्या बाजूने उभे राहा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी स्पष्ट करण्यात आले की, भाजप वगळता इतर राजकीय पक्षांसोबत चर्चा सुरू असून, याबाबतचा अंतिम निर्णय पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर व राज्य समिती योग्य वेळी जाहीर करतील.

वंचित बहुजन आघाडी नांदेड शहरातील नागरिकांचे प्रश्न, तरुणांचे भवितव्य, स्वच्छता, पाणी, रस्ते व मूलभूत नागरी सुविधांसाठी लोकशाही मार्गाने संघर्ष करण्यास सज्ज असून, येणारी मनपा निवडणूक ही परिवर्तनाची निवडणूक ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## कोंडीबा हौसरे यांचे निधन



**मुदखेड (प्रतिनिधी)** – तालुक्यातील मौजे पार्डी येथील ज्येष्ठ नागरिक कोंडीबा शिवाजी हौसरे यांचे बुधवार, दि. १७ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर बुधवारी दुपारी ३ वाजता मौजे पार्डी येथील राहत्या घरून अंत्ययात्रा निघाली. मुदखेड तालुक्यातील पार्डी येथील बौध्द स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले आणि दोन मुली, जावई, पत्नी, नातवंड असा परिवार आहे. मौजे पार्डी येथील विद्यमान सरपंच सौ. अर्चना उर्फ संगीता मधुकर हौसरे यांचे मोठे भाये तर कृषी उत्पन्न बाजार समिती मुदखेडचे माजी संचालक मधुकर हौसरे आणि फिजिओ थेरीपीस्ट अशोक हौसरे यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.

### जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश धुडकावून धार्मिक तेढ

## युवतीवर वजिराबाद ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा-धिकाऱ्यांचा आदेश धुडकावून धार्मिक तेढ निर्माण केल्याप्रकरणी विवाहित युवतीवर वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, १४ डिसेंबर रोजी हर्षू ठाकूर या युवतीने पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उभे राहुन एका समाजाची प्रार्थना होत असताना भोंगे बंद करा असे ओरडून युवकांना चिथावणी दिली. या संदर्भाने करीष्मा किशनसिंह परिहार उर्फ हर्षू ठाकूरचा हा प्रयत्न दोन समाजात दंगल घडविण्याचा आहे. तिची इंस्टाग्राम आयडी कायमची बंद करावी आणि गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करणारा अर्ज अनेक मुस्लिम युवकांनी पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी आणि प्रशासनाला दिला असून, अनेक युवक सामाजिक संकेतस्थळांवरून कारवाईची मागणी करत आहेत.

दि. १४ डिसेंबर रोजी हर्ष ठाकूर ही छत्रपती संभाजीनगर येथील युवती एका खाजगी भांडणाच्या संदर्भाने नांदेडला आली होती. त्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात सुध्दा जोर-जोरात ओरडून गोंधळ घातला. त्यानंतर पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर रस्त्यावर रास्ता रोको करत असताना त्याचवेळी सायंकाळच्या नमाजसाठीची अजान झाली. त्यावेळी हर्ष ठाकूर यांनी भोंगे बंद करा असा शब्दप्रयोग केला. सोबतच हर्ष ठाकूर यांनी एस. पी. ऑफीस, एस.पी.ऑफीस समोरील रस्त्यावरच्या व्हिडीओ क्लिप आपल्या इंस्टाग्राम आयडी harsuthkur4747 यावरून प्रसारीत पण केल्या.

रास्तारोको संदर्भाने वजिराबाद पोलिसांनी हर्ष ठाकूर आणि इतर नऊ जणांविरुध्द जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या जमावबंदीचा भंग केला अशा स्वरुपाचा वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस यांची आज मुखेडमध्ये प्रचार सभा

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गुरुवार, दि. १८ डिसेंबर रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड दौऱ्यावर येत आहेत. नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीतील भाजपा उमेदवारांच्या प्रचारार्थ गुरुवारी दुपारी ३ वाजता शहरातील जिल्हा परिषद हायस्कूलच्या मैदानावर मुख्यमंत्री फडणवीस यांची सभा होणार, अशी माहिती मुखेड मतदारसंघाचे आ. डॉ. तुषार राठोड यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सभेला नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे, माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, खा. अजित गोपछडे, महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, भाजपाचे संघटनमंत्री संजय कौडगे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष डॉ. संतुक हंबर्डे, आ. राजेश पवार, आ. जितेश अंतापूरकर, मुखेडचे माजी नगराध्यक्ष गंगाधर राठोड यांच्यासह अनेकांची उपस्थिती राहणार आहे. या सभेस तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती खुशाल पाटील उमरदरीकर, भाजपाचे मंडळ अध्यक्ष बालाजी पाटील सकनूरकर, व्यंकटराव पाटील जाधव यांच्यासह शहर व तालुका भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## विनापरवाना पिस्तूल बाळगणारा युवक अटकेत; पिस्तूल आणि काडतूस जप्त, एलसीबीची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात गस्तीवर असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संशयास्पद फिरणाऱ्या युवकास ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक पिस्तूल आणि काडतूस जप्त केले आहे. सदर युवक हा परभणी जिल्ह्यातील चुडावा येथील रहिवासी आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक वसंत आरसेवार व त्यांचे पथक शहरात गस्त घालत होते. बुधवार, दि. १७ डिसेंबर रोजी पेट्रोलिंग दरम्यान सपोनि आरसेवार व त्यांचे पथकातील अंमलदार यांना साईबाबा कमान, सार्वजनिक रोडजवळ कौठा (जुना) येथे दोन युवक गावठी पिस्टल (अग्नीशस्त्र) खरेदी, विक्री करण्यासाठी बाळगून असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी शहरातील साईबाबा कमान, सार्वजनिक रोडजवळ कौठा येथे कारवाई केली असता एक युवक पोलिसांची चाहुल लागताच तेथून पळून गेला. मात्र सुरज शिवाजी देसाई (वय २४, रा. हनुमान मंदिराजवळ चुडावा ता. पूर्णा जिल्हा परभणी ह.मु. गणपती मंदिराजवळ वामननगर, नांदेड) हा मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यात एक गावठी पिस्तूल व एक जिवंत काडतूस असा २५ हजार ५०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पळून गेलेला विजय वाठोरे रा. देशमुख जिम जवळ, चैतन्यनगर नांदेड याच्याकडून खरेदी केल्याचे सांगितले. सुरज शिवाजी देसाई यास मुद्देमालासह नांदेड ग्रामीण यांच्या ताब्यात देऊन भारतीय हत्यार कायद्यांतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला. तसेच आरोपी सुरज शिवाजी देसाई हा पो. स्टे. नांदेड ग्रामीण गु.र.न. १९९/२०२५ कलम ११८(२), ११५(२), ३५२. ३५१(२) बीएनएसमध्ये देखील फरार होता.

## अखेर जड वाहनांना रमाई माता चौक ते सिडको लातूर फाटा प्रवेश बंद



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – रमाई माता चौक ते वसंतराव नाईक महाविघालय, संभाजी चौक मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, लातूर फाटा या मुख्य मार्गावर भरधाव वेगाने ये-जा करणारी हायवा, टिप्पर, आयचर यासह चारचाकी वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला आहे.

ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी संबंधित बांधकाम विभाग व मनपा प्रशासन यांना लेखी पत्राद्वारे कळविल्यानंतर १७ डिसेंबर रोजी जड वाहनांना प्रवेश बंदीसाठी माता रमाई माता येथे लोखंडी कमान टाकून हा रस्ता जड वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला.

नांवा शहर मनपाच्या सिडको परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर लातूर फाटा ते रमाई माता चौक मार्गावर गेल्या अनेक दिवसांपासून हायवा, टिप्पर, मोठे ट्रक, आयचर टेम्पो यासह अनेक चारचाकी वाहने भरवस्तीतून सुसाट वेगाने जात असल्याने छोटे वाहनांसह नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. या मुख्य मार्गावर, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेसह नागरी वसाहत असल्याने दैनंदिन अपघाताचे प्रमाण वाढले होते, याबद्दल परिसरातील नागरिक, सामाजिक संघटना यांनी आंदोलन केल्यानंतर मनपाच्या वतीने दोन्ही बाजूंनी लोखंडी कमान टाकून जड वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला. तीन-चार दिवसात कमानीला जड वाहनांने धडक दिल्याने कमान निकामी झाल्याने लोखंडी पोल काढण्यात आले होते, पुन्हा या मार्गावर भरधाव वेगाने मोठी वाहने जाऊ लागल्याने त्रास सहन करावा लागला.

अखेर या बाबत ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी पुढाकार घेऊन बांधकाम विभाग नांदेड व मनपा सार्वजनिक बांधकाम विभाग यांना लेखी पत्र देऊन जड वाहनांना प्रवेश बंदी करावी यासाठी पुढाकार घेतला व सदरील ठिकाणी लोखंडी कमान टाकून एक साईड रमामाता चौक येथे बंद करण्यात आली असून बांधकाम विभाग अभियंता एन. एस. सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली महामार्ग अभियंता, कर्मचारी यांनी कार्यवाही केली. या प्रकरणी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी पाहणी केली आहे. या जड वाहनांना प्रवेशामुळे तीन चाकी, दुचाकी वाहनधारकांसह नागरीक, शालेय विद्यार्थी यांना दिलासा मिळाला आहे.

## माळेगाव यात्रेसाठी १६० बसेस

**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील श्री क्षेत्र माळेगाव यात्रा ही गुरुवार, दि. १८ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. पालखी सोहळा १८ डिसेंबर रोजी होणार असल्याने यात्रेला येणाऱ्या यात्रेकरूंसाठी राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभाग सज्ज झाला आहे. जिल्ह्यातील विविध आगारातून १६० लालपरींना माळेगाव यात्रेसाठी भाविक -भक्तांच्या प्रवासासाठी सज्ज केले आहे.

एसटी महामंडळाकडून माळेगाव यात्रा प्रवासी वाहतुकीसाठी जादा १६० बसेस उपलब्ध करुन दिल्या आहेत. यामध्ये आगारनिहाय बस संख्या नांदेड- २७, भोकर- १२, किनवट- २, मुखेड- २७, देगलूर- २७, कंधार- ३५, हदगाव- १०, बिलोली- २० अशा १६० जादा बसेस यात्रेकरूंसाठी सोयीच्या ठरणार आहेत.

## वासरी नदीपात्रात मुदखेड पोलिसांची कारवाई

### १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** – मुदखेड तालुक्यातील वासरी शिवारात गोदावरी नदीपात्रातून होणाऱ्या अवैध वाहतूक वाळू घाटावर मुदखेड पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत इंजिन, बोटसह १४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मुदखेड पोलीस दि. १६ डिसेंबर रोजी ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम हे इंजीनचे सहाय्याने वासरी येथील नदीपात्रात, मुदखेड येथे अवैध रेती उपसा करीत आहेत. मिळालेल्या माहितीवरून वासरी शिवारात असलेल्या वाळू घाटावर पथकाने कारवाई केली असता तेथे दोन अनोळखी आरोपी हे इंजीनचे सहाय्याने वासरी येथील गोदावरी नदीपात्रातून अवैध रेतीचा उपसा करीत असताना पोलीस पथकास पाहून पळून गेले. सदर घटनास्थळावर मिळून आलेले रेती उपसा साहित्य वाळू उपसा करणेसाठी लागणारे २ इंजीन, बोट व ५ ब्रास वाळू असा एकूण १४ लाख १० हजार रुपयांचे मुद्देमालाचा महसूलचे अधिकारी यांनी पंचनामा करुन रेती जप्त करुन इतर मुद्देमाल अवजड असल्याने जागीच जिलेटीनचे सहाय्याने नष्ट करण्यात आला. अज्ञात आरोपीविरुध्द मुदखेड ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी अभिनंदन करुन कौतुक केले आहे.

## श्री क्षेत्र माळेगाव यात्रेला आजपासून प्रारंभ; देवस्वारी-पालखी पूजन व कृषी प्रदर्शन

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेल्या श्री क्षेत्र माळेगाव येथील श्री खंडोबाच्या यात्रेला आजपासून देवस्वारी व पालखी पूजनाने प्रारंभ होत आहे. यानिमित्ताने शेतकऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या कृषी प्रदर्शनाचे उद्घाटनही आज करण्यात येणार आहे.

आज दुपारी २ वाजता देवस्वारी व पालखी पूजन संपन्न होणार असून, यावेळी पालकमंत्री अतुल मोरेश्वर सावे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास खा. अशोकराव चव्हाण, बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील, खा. डॉ. अजित गोपछडे, खा. रवींद्र चव्हाण, खा. डॉ. शिवाजी काळगे, खा. नागेश पाटील आष्टीकर यांच्यासह आ. सतीश चव्हाण, आ. विक्रम काळे, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, आ. भीमराव केराम, आ. डॉ. तुषार राठोड, आ. बालाजीराव कल्याणकर, आ. राजेश पवार, आ. जितेश अंतापूरकर, आ. आनंदराव बोंढारकर, आ. बाबुराव कदम कोहळीकर, आ. श्रीजया चव्हाण, विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, माळेगावच्या सरपंच कमलबाई रुस्तुमराव धुळगंडे आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.



आज दुपारी ३ वाजता शेतकऱ्यांच्या हितासाठी आयोजित कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब मोहनराव पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांची विशेष उपस्थिती राहणार असून आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार आनंदराव बोंढारकर, आमदार राजेश पवार व कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहेत.

**उद्या अश्व-श्वान-कुक्कुट प्रदर्शन व महिला-बालकांसाठी स्पर्धा**

माळेगाव यात्रेच्या निमित्ताने शुक्रवार, दि. १९ डिसेंबर रोजी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने सकाळी १० वाजता अश्व, श्वान व कुक्कुट प्रदर्शन तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते होणार असून, खासदार डॉ. अजित गोपछडे व आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. प्रमुख उपस्थितीत आ. सतीश चव्हाण, आ. विक्रम काळे, आ. डॉ. तुषार राठोड, आ. बालाजीराव कल्याणकर तसेच पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे उपायुक्त राजकुमार पडिले उपस्थित राहणार आहेत.

सकाळी ११ वाजता माळेगाव यात्रेत महिला व बालकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमाचे उद्घाटन लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, आ. श्रीजया चव्हाण व आ. जितेश अंतापूरकर हेही उपस्थित राहणार आहेत. श्री खंडोबा यात्रेच्या निमित्ताने धार्मिक, सांस्कृतिक व कृषी-पशुसंवर्धन उपक्रमांमुळे माळेगाव यात्रेला यंदा विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com